# ताझा सलीम यांची कविता

अनुवाद: प्रदीप गोपाळ देशपांडे



म. ग्रं. सं. ठाणे.
विषय [illegible]
२५९२४

REFBK-0025899
REFBK-0025899

સંદર્ભ ગ્રંથ

૨૫૯૪

૨૫૪૯૯

૩૦૧૫૧૯

संदर्भ काव्य २५९४
२५८९९
३०।५।८९

# काझी सलीम यांची कविता

अनुवाद
प्रदीप गोपाळ देशपांडे

REFBK-0025899
REFBK-0025899

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०

प्रकाशक :
अनिलकुमार मेहता,
मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

© प्रदीप गोपाळ देशपांडे,
इंग्रजी विभाग प्रमुख,
स. भु. विज्ञान महाविद्यालय,
औरंगाबाद ४३१ ००१

प्रथमावृत्ती : मार्च, १९८९

मुखपृष्ठ :
चंद्रमोहन कुलकर्णी

मुद्रक :
सौ. कमल रामचंद्र घळसासी,
संजीव मुद्रणालय,
४६९, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

मूल्य :
३० रुपये

ISBN 81-7161-023-4

कै. ती. डॉ. उमेश गोपाळ पेंढरकर

व

कै. ती. गोपाळ माधव देशपांडे

यांच्या आठवणींना...

संपादन :
प्रदीप गोपाळ देशपांडे

लिप्यंतर :
प्रदीप गोपाळ देशपांडे
सी. गायस भक्तुल

ऋणनिर्देश :
काझी सलीम, मक्बूल बानो, सल्मा, सावरी देशपांडे, अंजलि जोशी, दीप्ति फडके
डॉ. इस्मत जावीद, प्रा. मोहन बाळकृष्ण प्रभु, शि. पां. जोशी,
सुधाताई भागवत, डॉ. सुहासिनी इर्लेकर, मु. घ. कुलकर्णी,
प्रा. वसंत कुंभोजकर, पुरुषोत्तम गावरस्कर,
मीर मुजाहिद अली, उल्का देशमुख.

काझी सलीम यांच्या अनुवादित कवितांच्या या संग्रहातील कविता त्यांच्या ‘ नजातसे पहले ’ या प्रकाशित व ‘ जमीर ’ या आगामी काव्यसंग्रहांतून निवडलेल्या आहेत. काही प्रकाशित कवितांमध्ये नंतर स्वतः काझी सलीम यांनीच काही बदल केलेले आहेत. प्रस्तुत अनुवाद हे त्यांच्या कवितांच्या सुधारित संहितेवर आधारित आहेत. आवश्यक वाटले, तेथेच अनुवाद स्वैर करण्याचे स्वातंत्र्य घेतले आहे.

या अनुवादित कविता संग्रहरूपाने प्रकाशित व्हाव्यात, यासाठी माझे मित्र व मराठी-तील समीक्षक प्रा. बाळकृष्ण कवठेकर यांनी दाखवलेली आत्मीयता व घेतलेले प्रयास अत्यंत मोलाचे आहेत. मी त्यांचा व श्री. अनिल मेहता यांचा ऋणी आहे.

तसेच या पुस्तकाच्या हस्तलिखितापासून ते प्रकाशनापर्यंत सर्व बाबींमध्ये माझे मित्र श्री. मोहन वेल्हाळ व डॉ. दत्तात्रय पुंडे यांनी आपुलकीने लक्ष घातल्याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत.

या उर्दू कवितांच्या लिप्यंतरापासून ते त्यांच्या अनुवादांच्या संग्रहापर्यंत कशाचाही विचार माझा मित्र व इंग्रजी कवी सी. गायस भक्तुल याच्याशिवाय मी करू शकत नाही. या पुस्तकाचे खरे श्रेय त्याचे आहे. परंतु त्याचे आभार मानलेले त्याला व मलाही आवडणार नाही.

२० ऑक्टोबर, १९८८.
औरंगाबाद

प्रदीप गोपाळ देशपांडे

## काझी सलीम यांचे प्रकाशित साहित्य

**नजात से पहले : १९७२**
शबखून किताबघर प्रकाशन, अलाहाबाद
( उत्तर प्रदेश शासनाचा पुरस्कार )
( महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार )

**Lyrics From Arabia**
– Ghazi A. Algosaibi, Qazi Saleem.
Three Continents Press, Washington. 1986.

**रेगज़ारोंके गीत : १९८६**
गाझी अल्गोसाईबी यांच्या
From The Orient and The Desert या काव्यसंग्रहाचा उर्दू अनुवाद.
मख्तबे जामया प्रकाशन, दिल्ली.

**मसनवी बाग़बानो गुलफ़रोश : १९८७**
फाइन आर्ट्स पब्लिकेशन, औरंगाबाद.

**ज़मीर** ( आगामी काव्यसंग्रह )
शमा पब्लिकेशन्स् , दिल्ली.

काव्य २५८९९ ३०।५।८९

## अनुक्रम


अप्राप्य
बुद्धाच्या मूर्तीसमोर
१. वारसा
२. सुटका
नरकाच्या खाईत
तमासगीर
या नरकात
निवडुंग
मी पाह्यलं
थोतांड
खेळणी
तफावत
स्पर्शदंश
लाट
प्रतिबिंब
आठवण
सुगी
मृत्यूप्रमाणं
तुझ्या बरोबरचे प्रवास
माणसं मरणालाच मीलन का म्हणतात ?
फिराक़ गोरखपुरीसाठी
असो
दिलासा
थोडा वेळ थांब
बिनफळाचं झाड
...आणि एक फळ पडलं माझी लाडकी बाहुली होऊन
पुनर्जन्म
The Misfit
हॅम्लेट
हॉस्पिटलमधून घरी परतल्यावर
व्हायरस
टेस्टट्यूब बेबीज्
नव्या पिढीच्या नावानं
दूर चाललेल्या वयाकडं पाहण्याचे काही दृष्टिकोन
मी सदैव सरहद्दींवर जगत आलो...
सिंफनी
मुक्ती

# प्रास्ताविक

काझी सलीम हा उर्दू नवकवितेतला आणि समकालीन उर्दू कवितेतला एक अत्यंत महत्त्वाचा कवी आहे. उर्दू कवितेचा पारंपरिक व प्रस्थापित एकरूपी चेहरामोहरा बदलून तिला भारतातल्या इतर भाषांमधील आधुनिक व समकालीन कवितेच्या प्रवाहात आणून सोडण्याचं मोलाचं काम करणाऱ्या कवींमध्ये काझी सलीम यांचं महत्त्व अनन्य-साधारण आहे.

मला महत्त्वाच्या वाटलेल्या त्यांच्या काही कवितांचे मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांना त्यांच्या कवितेची ओळख करून देण्यामागे एक हेतू आहे.

इतर भाषांमध्ये अनुवादित झालं असतं, तर जगातल्या उत्कृष्ट साहित्यात गणलं गेलं असतं, असं बरंच भारतीय साहित्य केवळ अनुवादाविना अनोळखी राहिलेलं आहे. अनुवादाच्या माध्यमातून जगातल्या विविध भाषांमधील साहित्य हे केवळ भाषांतरितच होतं, असं नाही, तर अनुवादामुळं जगातील विविध वाङ्मयीन संस्कृतींना परस्परांचे संदर्भ प्राप्त होतात. जाणिवेला आणि जगण्याला वैश्विक विस्तार लाभणं हे अधिक सुसंस्कृतपणं शक्य होतं.

पाश्चात्त्य देशांत अनुवाद हे वाङ्मयीन जगातील एक अत्यंत महत्त्वाचं कार्य मानून अनेक समर्थ लेखक व कवींनी स्वतःच ते सातत्यानं व कर्तव्यबुद्धीनं केलेलं आहे. सातत्य तर दूरच राहो, पण कर्तव्यबुद्धीनं हे काम भारतीय वाङ्मयीन जगात फार कमी झालेलं आहे. भारतात विविध भाषांमधील पंडितांनी वर्षानुवर्ष साहित्यातील 'भारतीयत्वा'चीच चर्चा केली. आणि ती करीत असताना वेगवेगळ्या भाषांमधील उत्कृष्ट साहित्यकृतींपेक्षा एकमेकांशीच घनिष्ठ संबंध प्रस्थापित केले. त्यामुळं काही मोजके अपवाद वगळता मूळ भाषांमधील अत्यंत सुमार अशा साहित्यकृतींचेच अनुवाद अधिक झाल्याचं दिसून येतं. आणि मग अशाच अनुवादित साहित्यकृती उराशी कवटाळून तीच तीच मंडळी वेगवेगळ्या ठिकाणी भेटून 'भारतीयत्वा'ची चौकशी करीतच राहिली.

अशा पूर्वपरिस्थितीत दर्जेदार साहित्यकृतींचा अनुवाद करण्याचं महत्त्वाचं कार्य अलीकडे गंभीरपणे सुरू आहे, ही फार आशेची बाब आहे. मराठीत दिलीप पुरुषोत्तम चित्र्यांसारख्या जबरदस्त कवीनं अनुवादाचं आणि अनुवादाच्या आवश्यकतेचं अथक प्रतिपादन करणं हे फार मोलाचं ठरणार आहे.

काझी सलीम यांची कविता उर्दू भाषा न जाणणाऱ्या मराठी वाचकांना उर्दू कवितेच्या किमान आवश्यक अशा पार्श्वभूमीवर कळावी, या हेतूनं काही सांगणं अगत्याचं ठरतं.

उर्दू नवकवितेचा विचार करताना तिच्या आधी लिहिल्या गेलेल्या स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील प्रगतिवादी कवितेचाही विचार करावा लागतो. प्रगतिवादी कविता ही आरंभापासूनच सुसंघटित अशा एका वाङ्मयीन चळवळीद्वारे लिहिली गेली व प्रगत झाली. जुलै १९३५ मध्ये पॅरिसमध्ये World Congress of Writers for The Defence of Culture भरली होती. या काँग्रेसमध्ये युरोपातील अनेक लेखक, कवी सहभागी झाले होते. महायुद्धातील संहारात होरपळलेलं दुःखी जग हे तत्कालीन सर्व साहित्याच्या आणि चर्चांच्या केंद्रस्थानी होतं. शिक्षणासाठी लंडनमध्ये येऊन राहिलेले भारतातील अनेक तरुण लेखक, कवी पॅरिसमध्ये भरलेल्या या काँग्रेसला आवर्जून उपस्थित होते. यांत मुल्कराज आनंद, ज्योति घोष, सज्जाद जहीर, मुहंमदबिन तासीर, प्रमोद सेनगुप्ता, मेहमुदुज्जफर, रशीद जहाँ, प्रोफेसर अहमदअली, इत्यादींचा प्रामुख्यानं उल्लेख करावा लागेल.

परदेशांत राहणाऱ्या भारतातल्या विविध भाषांमधील या तरुण साहित्यिकांनी या काँग्रेसपासून प्रेरित होऊन Indian Progressive Writers' Association लंडनमध्येच स्थापन केलं. १९३५ मध्ये लंडनमध्ये झालेल्या या Progressive Writers' Association ( PWA ) च्या स्थापनेत भारतातल्या विविध भाषांमधील साहित्यिकांचा सहभाग होता, ही फार महत्त्वाची बाब आहे. साहित्यातील या प्रगतिवादी चळवळीचा जाहीरनामा मुल्कराज आनंद यांनी लिहिला. नंतर ज्योति घोष यांनी त्यात काही बदल केले.

फॅसीझमचा धोका साहित्याद्वारे सांगितला जावा अन् मानवतेशी संबंधित दुःखाच्या अभिव्यक्तीला साहित्यानं वाहून घ्यावं, अशी आग्रही भूमिका असणाऱ्या या साहित्यिकांतली बव्हंशी मंडळी मार्क्सिस्ट होती. परंतु आपल्या लेखनातून मार्क्सवाद व्यक्त करण्याचा सोस त्यांनी धरला नाही. साहित्यात प्रगतिवादी (तरक्कीपसंद) चळवळ सुरू करणाऱ्या या तरुण लेखक-कवींना गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर, पंडित जवाहरलाल नेहरू यांचा आशीर्वाद होता.

या साहित्यिकांतील उर्दू मंडळी भारतात परत आल्यावर १९३६ च्या सुमारास त्यांनी 'अंजुमने तरक्कीपसंद मुसन्निफिन' ही निव्वळ उर्दू साहित्यिकांची प्रगतिवादी चळवळ अलगपणे सुरू केली.

दरम्यान इंग्लंडमध्येच स्थापना झालेल्या मूळ PWA च्या जाहीरनाम्याच्या प्रती भारतात येऊन पोहोचल्या होत्या. त्या मुन्शी प्रेमचंद यांनी 'हंस' मध्ये प्रकाशितही केल्या होत्या. नंतर अलाहाबादेत भरलेल्या हिंदुस्तानी अकादमीच्या अधिवेशनात हा जाहीरनामा मांडला गेला व स्वीकारलाही गेला. लाहोर, अलीगढ, हैद्राबाद, कलकत्ता,

अमृतसर, लखनौ या अविभाजित भारतातल्या प्रमुख शहरांमधून प्रगतिवादी चळवळ चालवणाऱ्या शाखाही निघाल्या.

ज्या तरुण व महत्त्वाच्या उर्दू साहित्यिकांनी या शहरांमधून प्रगतिवादी चळवळ सक्रियपणे चालवली, त्यांत अख्तर हुसेन रायपुरी, डॉ. मेहमुदुज्जफर, हयातुल्ला अन्सारी, फैज अहमद 'फैज', मकदुम् मोहिऊद्दिन, अली सरदार जाफरी, जाँ निसार अख्तर, ख्वाजा अहमद अब्बास, प्रोफेसर अहमद अली, साहिर लुधियानवी, इत्यादींचा सहभाग फार महत्त्वाचा होता. यांतील मजाज लखनवी, फैज अहमद 'फैज' आणि नंतर सरदार जाफरी, कैफी आझमी हे कवी अत्यंत लोकप्रिय झाले.

प्रगतिवादी चळवळीतल्या या कवींनी उर्दू कवितेत आमूलाग्र बदल घडवून आणले. राष्ट्रीय व जागतिक पातळीवर घडणाऱ्या राजकीय, सामाजिक घडामोडींमधून निर्माण झालेल्या व नव्यानं समोर उभ्या राहिलेल्या वास्तवाचा उर्दू कवितेनं स्वीकार केला. मग ठरावीक व साचेबंद प्रतिमांची आवेशपूर्वक मोडतोड झाली. उर्दू कवितेतल्या पारंपरिक आशयद्रव्याची टर उडवली गेली. उर्दू ही सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक प्रतिकाराची भाषा बनली. नंतर दारिद्र्य, पारतंत्र्य, स्वातंत्र्य या आशयवस्तूंवर भाष्य करता करता ती स्फूर्तिगीतात्मक होऊ लागली आणि मग उर्दू कवितेतील मार्क्सवादाचा उच्चार जास्तच स्पष्ट ऐकायला येऊ लागला. फैज अहमद 'फैज' कडे अघोषित नेतृत्व असलेल्या या सर्व प्रगतिवादी कवींच्या कवितेत जाज्वल्य प्रतिभा होती, प्रखर वास्तव होतं. परंतु या कवितेत दाटलेला अंधार सदैव उजेडाचं वचन घेऊनच येऊ लागला. पुष्कळदा आजच्या वाळवंटाचं रूपांतर उद्याच्या नंदनवनात करू शकणाऱ्या शक्तीचा रंग हा 'लाल' आहे, असं ही कविता हट्टानं सांगू लागली.

दरम्यान प्रस्थापित प्रगतिवादी कवितेतल्या प्रचारकी शैलीला प्रगतिवाद्यांमधील नवीन कवींचा होऊ लागलेला विरोध अधिक तीव्र झाला आणि नून मीम राशीद या अस्सल प्रतिभावंत कवीच्या पुढाकारानं फैज वगैरेंच्या विरोधात एक समांतर चळवळ सुरू झाली. 'हल्का ए अर्बाबे जौक' या नावानं ही चळवळ चालविणाऱ्या कवींमध्ये अन्य प्रमुख कवी 'मीराजी', अख्तर उल् ईमान, युसुफ जफर, कय्यूम नजर, हामीद अझीझ मदनी, इत्यादी होते. प्रगतिवाद्यांमधील फैज वगैरे बंडखोर वडीलधारे उर्दू कवितेला आधुनिकतेच्या उंबरठ्यावर आणताना प्रचारकी होत होत शेवटी प्रस्थापित झाले. नून मीम राशीद, 'मीराजी', अख्तर उल् ईमान, इत्यादींनी प्रचारकी होत चाललेल्या आधुनिक उर्दू कवितेला अहम्‌वादाच्या चकव्यातून बाहेर काढून नवतेच्या वाटेवर आणलं. प्रगतिवादी उर्दू कवितेनं निर्माण केलेला माणूस बाद ठरवला. त्याच्या दुःखात दडलेला भावी बंडखोर खोटा पाडला. उर्दूची मुळातली रोमँटिसीझम्‌ची जात न विसरता कलम करून घेतलेल्या आधुनिकतेची गझल-गाणी गात जाणाऱ्या

माणसाचा आवाज नाकारला. आणि alienation नं घेरलेला, बिनआवाजाचा, बिनचेहऱ्याचा, तुटलेला, पुसलेला, उदास, अपूर्ण माणूस नवकवितेनं आवर्जून स्वीकारलेल्या दुर्बोधतेच्या धूसर आरशातून दाखवला.

१९६० मध्ये शमशुर्रहमान फारूकी यांनी अलाहाबादहून 'शबखून' या शीर्षकाचं एक नियतकालिक सुरू केलं होतं. 'शबखून'मधून प्रगतिवादी कवींविरुद्ध लेख लिहिले गेले. नंतर बहुतेक सर्वच नवे लेखक व कवी 'शबखून' मधून लिहू लागले. 'शबखून' हे खऱ्या अर्थानं उर्दू नवकवितेचं मुखपत्र झालं. 'शबखून'मधून तत्कालीन प्रमुख पाश्चात्त्य कवितांचे अनुवाद प्रसिद्ध झाले. अस्तित्ववादावर लेख लिहिले गेले. टी.एस्.ईलियटवर लेख लिहिले गेले. दुर्बोधतेच्या आवश्यकतेचं प्रतिपादन केलं गेलं.

'शबखून' मधून पुढं आलेल्या व उर्दू नवकवितेला इतर भारतीय भाषांमधील कवितेच्या प्रवाहात आणून समकालीन बनवणाऱ्या कवींमध्ये काझी सलीम, बलराज कोमल, अमीक हनफी, मोहंमद अल्वी, बाकर मेहेदी, आदिल मन्सूरी, वहीद अख्तर, शहरेयार, कुमार पाशी, राजनारायण 'राज' यांचा उल्लेख प्रामुख्यानं करावा लागतो.

याच सुमारास 'नये नाम' या शीर्षकाचं एक पुस्तक प्रकाशित झालं. यात अनेक नवकवींच्या कविता होत्या. मुक्तछंदाचा उद्घोष करणाऱ्या या संग्रहात काझी सलीम यांच्याही कविता होत्या.

'शबखून' मधून पुढं आलेली व 'नये नाम' मध्ये समाविष्ट असलेली ही सर्व कवी मंडळी राशीद, मीराजी, अख्तर उल ईमान यांच्याच काळातील; पण नंतरच्या तरुण पिढीतील होती. हे नवकवी नंतर राशीद वगैरेंपासून हळू हळू दूर गेले आणि 'इस्तेहादी अदब' या नावाची नवकवितेतली एक स्वतंत्र चळवळ त्यांनी स्थापन केली. 'इस्तेहादी अदब'नं वाङ्मयीन मूल्यांच्या अर्थांचा पुनर्विचार केला. 'इस्तेहादी अदब'चा जाहीरनामा तयार करण्यात काझी सलीम यांचा सहभाग फार मोलाचा होता. हा जाहीरनामा लखनौहून प्रकाशित होणाऱ्या 'किताब' या नियतकालिकाच्या एका अंकात प्रसिद्ध झाला होता, असं काझी सलीम सांगतात.

रोमँटिसीझमच्या अत्युत्कट आविष्कारात अखेरपर्यंत हरवलेला फिराक गोरखपुरीसारखा कवी हा प्रगतिवाद्यांपासून अलग होणाऱ्या नवकवींनी का नाकारावा, हे समजू शकतं; परंतु आपल्या पौर्वात्यतेविषयी अंतर्मुख होऊन इस्लाममध्ये जनजागरणाची आवश्यकता वारंवार प्रतिपादित करणारा महंमद इक्बालसारखा मोठा कवी कोणत्याही उपयोगासाठी बव्हंशी प्रगतिवाद्यांनी व नवकवींनीही का टाळावा, हा स्वतंत्र चर्चेचा व

वादाचा विषय आहे.

'इस्तेहादी अदब' या चळवळीचाही संघटितपणा कालांतरानं संपला आणि या चळवळीतील बहुतेक कवींची कविता स्वतंत्र, वेगळी वैशिष्ट्यं घेऊन विकसित झाली. आणि यानंतरच काझी सलीम या कवीकडे स्वतंत्रपणे पाहणं योग्य ठरतं.

काझी सलीम यांचीही कविता प्रारंभी प्रगतिवादी कवितेच्या ढंगाची व जरा मार्क्सिस्ट अंगाची होती. त्यांच्या 'नजातसे पहले' या संग्रहापूर्वीच्या कवितांवर अख्तर उल ईमान यांच्या शब्दकळेचा प्रभाव आहे. नून मीम राशीद यांच्या शैलीचा प्रभाव मात्र कवितेपेक्षा काझी सलीम यांच्या चिंतनशैलीवर अधिक असल्याचं जाणवतं. सर्व शक्यतांचा विचार संपूनही अनुत्तरित राहणारे जीवनाविषयीचे मूलभूत प्रश्न विचारण्याची काझी सलीम यांची तऱ्हा त्यांनी प्रगतिवाद्यांकडूनच घेतलेली आहे. असं असूनही उर्दूतल्या वादग्रस्त अर्थानं पहिल्यावहिल्या कवींपैकी शाह सिराज औरंगाबादी या औरंगाबादच्या तीन शतकांपूर्वीच्या कवीच्या 'दखनी बोली'तल्या कवितेत काझी सलीम हे आपल्या कवित्वाची मुळं शोधतात, हे फार महत्त्वाचं आहे. दखनमधल्या मराठवाड्यातील पहाड, कातळ, घाट, रानं, ओसाडी हा काझी सलीम यांच्या कवितेचा अटळ परिसर आहे. त्यांच्या कवितेत उर्दू, मराठी, हिंदी या भाषांचा बेमालूम मेळ झालेल्या दखनी बोलीचं प्रभावी व नवं रूप आहे.

मध्य आशियातून मोगल सम्राटांबरोबर भारतात आलेल्या फारसी आणि भारतातील ब्रिज, हिंदी व अनेक प्राकृत हिंदवी भाषा यांच्या संकरातून निर्माण होत गेलेली उर्दू ही आज भारतीय उपखंडावरील एक महत्त्वाची दैनंदिन व साहित्य-व्यवहाराची भाषा आहे. भारतात येताना मोगलांनी बरोबर आणलेल्या आपल्या मूळ मुलखाच्या उत्कट आठवणी कालांतरानं दरबारी आश्रयानं विकसित होत गेलेल्या कवितेत प्रतिमा झाल्या. नंतर कविता व उर्दू राजदरबारांमधून बाहेर पडली, तरीही पारंपरिक प्रतिमांपासून ती मुक्त झाली नाही. अगदी आजही एकीकडे अनेक समकालीन उर्दू कवी हे महत्त्वपूर्ण नवकविता लिहीत असतानाच, दुसरीकडे बव्हंशी उर्दू कविता ही गझलच्या आखाभोवतीच फिरत असून साकी, मयखाना, शमा, परवाना, बज्म, नर्गिस याच प्रतिमांच्या जन्मखुणा हटवादीपणानं नोंदवते.

उर्दू कविता ही मुख्यतः गझल आणि नज्म या काव्यप्रकारांतून लिहिली गेलेली आहे व अजूनही लिहिली जात आहे. अगदी समकालीन उर्दू कवींमध्येही बऱ्याच कवींनी आपली कविता नज्मप्रमाणेच गझल या काव्यप्रकारातूनही आवर्जून लिहिली आहे. काझी सलीम मात्र गझल हा काव्यप्रकार जाणीवपूर्वक टाळतात. याचा अर्थ गझल या प्रकाराला

आवश्यक असणारी छंदबद्ध कविता लिहिण्याची क्षमता काझी सलीम यांच्याजवळ नाही, असा नाही. लेखक-कवींना आपल्या मर्जीबरहुकूम त्यांचं लेखन बदलायला लावणाऱ्या तमाम समीक्षक व पंडित मंडळींवर आसूड ओढणारी व त्यांना त्यांची दुय्यम जागा दाखवून देणारी अभिजात शैलीतील एक छंदबद्ध व दीर्घकविता लिहून काझी सलीम यांनी आपली ' उस्तादगी ' लीलया (' मसनवी बागबानो गुलफरोश ') दाखवून दिली आहे.

गझलमधून व्यक्त होताना प्रखर वास्तवदेखील काव्यमय व गेय होतं आणि नकळत एक श्रोताही गृहीत धरते. म्हणूनच गझलमधील आशय हा मुक्त असा आक्रांत राहत नाही, तर कुणासमोर सादर होत असल्याचं एक भान त्यात सदैव उरतं. हे भान कितीही झिरझिरीत अथवा दुर्बल असलं, तरीही उगवण्याच्या उत्स्फूर्त ऊर्जेला ते अडसरच ठरतं, असं काझी सलीम यांची प्रतिभा मानते.

इस्लाम, भगवद्गीता, हिंदुपुराणकथा, बुद्ध, ख्रिस्त व त्यांच्या धर्मग्रंथांतले अनेक संदर्भ काझी सलीम यांच्या कवितेत तितक्याच सहजतेनं येतात, जितक्या सहजतेनं हे धर्म सामूहिक भारतीय जीवनात अस्तित्वभूत आहेत. त्यांच्या कवितेत कुठल्याच धर्माचा प्रवक्ता कटाक्षानं ऐकू येत नाही. ते विविध धर्मांचा वापर आपल्या काव्यनिर्मितीच्या प्रक्रियेत केवळ कच्चा धातू– raw material– म्हणून करतात. आम्ही जगत आहोत, त्या काळात कोणत्याही धर्माचं साध्य हे धार्मिकता व कर्मकांडांनी प्राप्त होऊ शकत नाही, तर हे साध्य प्राप्त करण्यासाठी अपुऱ्या पडणाऱ्या धर्माच्या जबाबदारीचं आव्हान आज कवितेनं स्वीकारलं पाहिजे, अशी आग्रही श्रद्धा काझी सलीम यांच्या कवितेत आढळते. (' मुक्ती '). त्यांच्या कवितेत अपार चिंतन, बौद्धिकता व वैचारिकता असूनही त्यांनी आपली कविता बुद्धिप्रधान होऊ दिली नाही.

काही नव्या व मोजक्या जुन्या कवींचे अपवाद वगळता उर्दूतली एकूणच कविता ही टोकाचा कल्पनाविलास व अतिभावुकता यांचं संवर्धन करणारं कविजगातल्या हळव्या हकीमांनी तयार केलेलं एक यूनानी भावासव होऊन बसली होती. काझी सलीम यांनी आपल्या कवितेत हा औषधी धोका जाणीवपूर्वक टाळला आहे.

' स्पर्शदंश ', ' तुझ्याबरोबरचे प्रवास ', ' असो ', ' दिलासा ', ' आठवण ', ' प्रतिबिंब ', ' सुगी ' ' मृत्यूप्रमाणं ', ' तफावत ' यांसारख्या कविता मुद्दाम निवडून अनुवादित करण्यामागील माझा हेतू त्यांतील आशय हा रोमँटिक असला, तरीही प्रचलित उर्दू कवितेपेक्षा प्रकृतीनं तो किती भिन्न आहे, हे दाखवण्याचा आहे. रोमँटिझसीम्‌विषयीची काझी सलीम यांची भूमिकाच ' फिराक गोरखपुरीसाठी ' यासारख्या कवितेतून सूचित होते. निःसंतान माणसाचं निशाचरागत एकटेपण आणि त्या पार्श्वभूमीवर मूल झाल्या-

नंतरचा भावनांचा बहर (' ग्रिनफळाचं झाड ' व ' आणि एक...बाहुली होऊन ') हा अनुभव उर्दू कवितेत तसा अभावानंच हाताळला गेला आहे. सत्याहत्तरच्या आणीबाणीवर लिहिलेली ' थोतांड ', भारतीय जीवनाचा दैनंदिन भाग होऊन बसलेल्या जातीय दंगलीवरील ' या नरकात ' किंवा पॅलेस्टाईनच्या मुक्तिसैनिकांसाठी लिहिलेली ' निवडुंग ' यांसारख्या कवितांमधून काझी सलीम यांच्या कवितेचं राजकीय–सामाजिक भान प्रकट होतं.

काझी सलीम यांच्या कवितेची मूळ प्रकृती चिंतनशील आहे. त्यांची कविता कधी माणसाच्या असहायतेची मुद्दाम खिजवणारी आठवण देणारं, कधी स्वतःच्या पराभवाची न विचारलेली कबुली देणारं, तर कधी विक्षिप्त विजयाचा दावा करणारं एक स्वगत झालेली आहे (' नरकाच्या खाईत '). या स्वगतात कधी तहाची भाषा आहे (' नव्या पिढीच्या नावानं '), तर कधी हे स्वगत आत्महत्येच्या वादळी आवाजानं घोंघावतं (' हॅम्लेट '). या कवीला कधी जगणाऱ्या सृष्टीतला मृत्यूचा अदृश्य चिरवावर चिमूट चिमूट ढासळणाऱ्या राखेतून जाणवतो (' दूर चाललेल्या...दृष्टिकोन ').

अगदी प्रियजनांच्या दुःखात गुंतताना देखील माणूस सुरक्षिततेची खबरदारी घेतो, आपल्याभोवती आपणच उंचावलेल्या मोहमायेच्या तटबंदीच्या आत कैद झालेला केवळ एक प्रेक्षक म्हणून स्वतःला सादर करतो, आणि तरीही आपणच उभारलेली ही तटबंदी कोसळवून टाकण्याची इच्छाही त्याला प्रबळपणे होत नाही, हे विचित्र सत्य हा कवी प्रभावीपणे सांगून जातो ( The Misfit ).

श्रद्धा, स्मृती यांना नाकारून फक्त वस्तुनिष्ठेचा आग्रह धरणारी विज्ञानाधिष्ठित पिढी ही टेस्टट्यूब बेबीज्सारखी आहे. ती एक अद्भुत आहे. आणि तरीही कोणत्याही आनुवंशिकतेशिवाय, अनुक्रमाशिवाय, अपरिचित पितृत्वातून सुषुप्तीतल्या मातृत्वमय अंधाराशिवाय अस्तित्वात आलेली टेस्टट्यूब बेबीज्सारखी ही मुलं कोणत्या संस्कृतीचा वारसा सांगतील ? त्यांना मागे वळून पाहायला कोणता इतिहास असेल ? वृक्षांना फुलवणारी, फळवणारी भूमी तळाशी नसलेली ही रोपं बिनमुळांची अशी किती खोल रुजू शकतील ? त्यांची फुलं, फळं कशी असतील ? असे अस्सल प्रश्न हा कवी उपस्थित करतो आणि अशा पिढीसाठी संस्कृती, नैतिकता, जीवनमूल्यं यांच्या संकल्पनांचा सर्वस्वी नवीन असा कोष नव्यानंच अस्तित्वात आणावा लागेल, असा महत्त्वाचा इशारा देतो. (' व्हायरस ', ' टेस्टट्यूब बेबीज् ').

उर्दू कवितेचा प्रवास हा पारंपरिक बागांमधून ' फुलणाऱ्या फुलांपासून ' ते फराजच्या ' पुस्तकांच्या पानांतून आढळणाऱ्या सुकलेल्या फुलां 'पर्यंत झाल्यानंतर माणसाचं अस्तित्व

हे पानंफुलं नसलेल्या खुंटासारखं उरलेलं आहे. अस्तित्वाच्या या खुंटानं आपल्या-भोवतीच्या अटळ परिसरात फुटलं पाहिजे, आपला सभोवताल श्वासला पाहिजे, आणि आपल्या सभोवतालच्या परिसराला आपलाही रंग आक्रमकपणं देऊ केला पाहिजे, असं सुचवणारी काझी सलीम यांची कविता सातत्यतत्त्व साजरी करणारी आहे. विज्ञानाच्या यशायशानं तुटत तुटत चाललेला माणूस कवितेतून जोडत जाण्याची जबाबदारी तळमळीनं स्वीकारणारी काझी सलीम यांची कविता माणसाला alienation कडून de-alienation कडे नेऊ पाहते.

कुराणाभिमान बाळगणारी, कर्मकांडांच्या काठाकाठानं अहंकारी श्रद्धेत एकाच दिशेनं जगत गेलेली कालची माणसं, आणि क्रमांचे बंध नाकारून जीवनाला निव्वळ कार्य-कारणभावाच्या बखेड्याच्या पातळीपर्यंत खाली आणून सोडणारी आजची व उद्याची माणसं यांच्या दुराग्रही रहदारीच्या विचित्र वर्दळीत कातरवेळी चकव्यात सापडलेला आजचा एक क्षेत्रहीन यात्रिक होऊन हा कवी आपण सदैव सरहद्दींवरच जगत आलो, अशी प्रामाणिक व महत्त्वपूर्ण कबुली देतो. ('मी सदैव सरहद्दींवर जगत आलो'). सरहद्दींवर जगत आलेल्या या यात्रिकाचा प्रवास पशुपक्ष्यांप्रमाणे निरागस असलेल्या व एकाच दिशेनं जगणाऱ्यांच्या गावांच्या हद्दींमधून जरा अधिक आहे. या हद्दीतल्या माणसांच्या निरागसतेच्या ओलाव्यातच सातत्यतत्त्वाचं बीज जिवंत राहण्याची शक्यता अधिक आहे, अशी आवाहक कबुली या कवितेत आहे. आणि हा विचार, आम्ही जगत आहोत, त्या मूल्यहीन संधिप्रकाशातल्या आजच्या विचित्र प्रहरी मला व्यक्तिशः फार मोलाचा वाटतो.

काझी सलीम यांनी इंग्रजी भाषेतून वाचलेल्या अनेक महत्त्वाच्या पाश्चात्त्य कवी व लेखकांच्या साहित्यावर चिंतन केलेलं आहे. रिल्के, रिम्बाँ, इलियट, लोर्का यांच्या कवितांचे अनुवादही केलेले आहेत. तथापि, कुणाच्या शैलीचा आपल्या कवितेवर उघड-उघड झालेला प्रभाव दाखवून आधुनिक होण्याचा हव्यास त्यांनी धरला नाही. आधुनिक पाश्चात्त्य कवितेतून तीव्रपणे प्रकट होत गेलेली मानवी असहायता व जगण्यातली निरर्थ-कता यांनी सादर केलेला माणूस हा शून्यवादानं (Nihilism) घेरलेला आहे. त्याच्या मानसिकतेत भयावह वैफल्य दाटलेलं आहे. या घेरलेपणापासून त्याला कसं वाचवता येईल, याचा ध्यास काझी सलीम यांच्या कवितेत सतत जाणवतो. या ध्यासातून प्रकट होणाऱ्या त्यांच्या मुक्तचिंतनात, वादसंवादात, स्वगतात एक आर्ष आध्यात्मिकता आहे. आणि म्हणूनच काझी सलीम यांची कविता केवळ भारतीयच नव्हे, तर प्रसंगी वैश्विक परिप्रेक्ष्यातही बघता येते.

पाश्चात्त्य कविता व साहित्यप्रवाह यांचं सजग भान असूनही काझी सलीम यांची

कविता जगातल्या विविध भाषकांना अपरिचितच राहिली आहे. याहूनही विचित्र म्हणजे ती गैर उर्दूभाषक असणाऱ्या खुद्द भारतीयांनाही अपरिचितच राहिली आहे. खरं तर काझी सलीम यांचे समकालीन व नंतरचे इतर अनेक समृद्ध कवीदेखील इतर भाषकांना अजूनही अपरिचित राहिलेले आहेत. त्यांचंही साहित्य विपुल प्रमाणात अनुवादित होऊन मराठीत येणं आवश्यक आहे.

**–प्रदीप गोपाळ देशपांडे**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शाखा

□ अप्राप्य

माझा प्राण नव्या नव्या कवितांमधून जन्म घेतो
अन् प्रत्येक पूर्तीनंतर माझ्या दिशेने पुन्हा परतून येतो
आकांक्षांनी दाटलेली एक शक्ती
शोधतीये असं एक रूप
ज्यात सारं काही सर्वस्वी माझंच असावं

असं रूप
जे विश्वाच्या विस्तारात डोलत डोलत
चंद्र-चांदण्यांपासून पाताळापर्यंत वाहत वाहत
आपल्या मोक्षाला जाऊन मिळावं...
माझी स्पंदनं येणाऱ्या युगांमध्ये सामील असावीत...

पण
नसतेपणाच्या महाकाय पहाडाला भेग पाडून
जेव्हाही एखादा झरा झुळझुळला
तेव्हा मी पाहिलं,
की त्याचं एक असं बहुरूपी रोपटं झालं
ज्याची मुळं दफन झालीयत् जमिनीत
अन् संपून गेलाय् सारा विस्तार फांद्यांतच...
नाहीतर मग
असं एक श्वापद उगवून वर आलं
ज्याचे दात रुतलेयत् आपल्याच मांसात
अन् ते संतुष्ट आहे कुत्र्यांच्या सवयीतच...
आणि मिळालंच कधी मानवी रूप,

□ बुद्धाच्या मूर्तींसमोर

## १. वारसा

वीस शतकांचा आकार आहेस तू
वीस शतकांचा अबोध आकार आहेस तू
बेदर्द वाऱ्यांनी तुझ्यावरनं जीभ फिरवली होती
आता माझा हात आहे
अन् माझ्या हातातली ही जिवंत ऊब लागल्यावर वाटेल तुला
की ऋतु बदललाय्
किंवा वाटेल, की कुठल्याशा उन्हाच्या तुकडयानं
तुला रोजच्यासारखं पुन्हा छेडलंय्
किंवा असं समज,
की एक थकलंभागलं पाखरू
बसलंय् येऊन

अशा उत्तुंगतेनं पाहू नकोस, की माझे हातही दगड व्हावेत

शहारल्याय्त रक्तवाहिन्यांच्या फांद्या शिरशिरताय्त
उठल्याय्त तरारून एक क्षणभर
जणू पुन्हा जुळून गेल्याय्त त्या प्राचीन मुळांशी आपल्या
आपल्यातल्या आपल्यातच उतरत जाणाऱ्या चुपचाप गुहांमधून
घनदाट वृक्षाच्या तळाशी
शोधत राहतो
सांग
कुठं हरवलाय्स

बोटाच्या इशाऱ्यासरशी उलट्या फिरत जाणाऱ्या चक्रीगत हे जग
बंद डोळ्यांत गुंडाळलं गेलंय्

दररोज सकाळचं वर्तमानपत्र जतावतं,
की या पृथ्वीवर सारी दारं बंद झालीत
हात आकाशाचे नाहीत उतरणार रात्री कधीच
कुणी खऱ्याची दुःखं वाटून घेणाराही नाहीय्
कुणी पीक सत्ययुगाचं काढणाराही आता नाहीय्

गुहेच्या डोळ्यांतून बघ मला
आपल्या खांद्यावर घेऊन वेताळाचं प्रेत
माघारी आलोय्
सांभाळ हा वारसा आपला

मी थकलंभागलं पाखरूच सही
धान्याच्या शेतात बुजगावण्यागत उभा आहेस तूही
चिमण्या घाबरून जातायत्
भयभीत होऊन भुकेल्याच परत येतायत्
चिमण्या जिवंत आहेत,
की बुजगावणं,
कुणास ठाऊक !

## २. सुटका

काळाचं ओझं
दगडी सामसूम
उंच उंच पहाड
मी पहाडांच्या पायथ्याशी पसरलेल्या गवतावर
पात्यापात्यावरला आशय वाचतोय्
गूढात गढलोय्

उशिरानं
तळ्याला डोळा लागला
न भ्यालेले पंख कुठं फडफडले
न कळ्या उमलल्या
न पानं हलली

गर्द हरवल्या झाडाझाडाला लागलेली निर्वाणाची आस
वाळलेल्या साऱ्या फांद्या क्रूस होतात
प्रत्येक गुहा जणू परमेश्वरी निरोप आणणाऱ्या
कुणा जिब्रएलसाठी उघडी आहे
कैलास चुपचाप आहे

प्रतिध्वनीच प्रतिध्वनी
शब्दहीन, अर्थहीन फक्त एक प्रतिध्वनी

बासरीची मधुर ओळ पसरली अन् वाटलं
जणू माझ्यात कुणी
पाखरासारखं पंख फडफडून शहारलंय्

रानात अबोधशी सळसळ
काही निरोप
पावलांची चाहूल
नाही
काही नाही
एक धनगर मेंढरांचा कळप घेऊन आला
हिरवळीवर निरागस मेंढरं पांगली
पाहता पाहता
पात्यापात्यावरला आशय अन् सारी गूढं चरून गेली

## □ नरकाच्या खाईत

काय भयानक आग होती
क्षणार्धात पसरत गेली
सर्वदूर आहेत फक्त अवशेष
राखेचे ढिगारे
ज्वालांच्या तेज जिभा जणू चाटून गेल्यात सारं काही

थांबून थांबून धमन्यांमधनं एक एक थेंब रक्ताचा
सरकतोय् वाट काढीत हरलेल्या लष्करागत

वाटतं,
की काटेरी गदेच्या दाहक आघातांनी
कुणी पाठलाग करतंय्
एक एक क्षण विचारू लागलाय्
की अपराधी कोण आहे ?
अखेर या आंधळ्या जबरीचं सावज कोण आहे ?
कुणी सांगितला माझा पत्ता ?
कुणी घेतलं माझं नांव ?

या प्रहरी
मी आपली एकएक सावलीसुद्धा मनातनं दूर सारली होती
चुकवून टाकली होती सारी कर्जं
ओरडणाऱ्या, किंचाळणाऱ्या माझ्या शब्दांचं काय होतं एवढं ?
भुंकून भुंकून चूप झाले असते
धापा टाकून टाकून वेदनेच्या पाताळांमध्ये झोपी गेले असते

कुणी सांगितला माझा पत्ता ?
कुणी घेतलं माझं नाव ?

हा देह
चाळणी झालेला हा जखमी देह
शिलगत जाणाऱ्या रात्रीच्या काळोखाचं ओझं
हजारो, लाखो मणांचं ओझं उचलणारा हा देह जिवंत आहे ?
की मृत्यूची नागीण—
माझ्या जन्मापास्नं रक्तात वावरणारी मृत्यूची नागीण
आपली कात विराण जंगलात टाकून निघून गेलीये ?

काय मी या आयुष्याचं फेकून दिलेलं जीर्ण लक्तर आहे ?
की उडत चाललेले सारे रंग
अन् उजाड झालेली सारी स्वप्नं एकत्र केली
तर तयार होतो मी ?
जो क्षणोक्षणी इच्छांच्या धगीनं वितळत वितळत
पसरतो परमेश्वराच्या आसनापर्यंत
अखेर यांतल्या कुणाला सजा होणारयू ?
कोण आहे सावज ?
कुणी सांगितला माझा पत्ता ?
कुणी घेतलं माझं नाव ?

वाटतं,
की थोडयाच वेळात
पिसाट रक्तपिपासू श्वापद
आपल्या नाकाडोळ्यांतनं आग ओकत
पुन्हा एकदा झडप घालील...
जहरी दात पुन्हा मांसात रुततील...
वितळलेल्या ज्वाळा सर्व दिशांना वाहतील...

माझ्या परमेश्वरा,
मी का म्हणून
अखेर मी का म्हणून कबुली देऊ ?

## □ तमासगीर

गरजतायत
तुटून कोसळतायत ढग
जणू तुफान दगडफेक सतत आभाळातून
जखमी छतं
तावदानांच्या काचांवर पाणी पांगतय्...पुढं सरकतंय् थेंबाथेंबानं
निसटत्या तुटणाऱ्या चिमुकल्या ओळी
थकलेल्या हातांवरल्या रेषांसारख्या
भरतायत सतत निरनिराळी रूपं

जराशीही रिकामी राहत नाहीये मनाची पोकळी
जे जे सापडतंय्, तिला ते ते घेतीये भरून हृदयात
इच्छा ही इच्छाच असते शेवटी
मग ती मृत्यूची का असेना
त्याच दुसऱ्या नसांमध्ये रक्ताचे बादळी प्रहार
तावदानांच्या काचांवर मग सरकतं, पांगतं त्यांचंच जाळं
याचना, विलाप, आक्रोश, हे सारं असतं फक्त
अखेरची एक दुबळी फडफड पंखांची...

मला माहीत आहे, की काळ जेव्हा वाहतो,
तेव्हा करत नाही भेदभाव लाटालाटांमध्ये
मग त्या शांत असोत, की असोत
कुठल्या तरी किनाऱ्यावर डोकं आपटणाऱ्या किंवा
स्फुंदत स्फुंदत वळणं घेत, तडफडत स्वतःच वाळूत विरून जाणाऱ्या
त्या काय वाटेल ते करोत

काय फरक पडणारय् ?

निसटत्या, तुटणाऱ्या चिमुकल्या ओळी
खिडक्यांच्या फटींमधनं निघून येऊ लागल्यायत फरशीपर्यंत
पण किती दूरवर जाऊ शकतील त्या अशा ओघळत ?
दिलासा...रेशमी निरोप...गुंगी आणणाऱ्या अमली इच्छा...
हे सारं कसं होऊ शकेल या तुफान दगडफेकीची ढाल ?

क्षणोक्षणी हजारो विश्वं विस्कटतात, जुळतात
कोसळतात अवाढव्य वृक्ष
पहाड होतात भुस्कट अन् कणाकणानं
खुपतात माझ्या धमनीधमनीतून

धुवांधार पावसाच्या हल्ल्यांनी आंधळ्या झाल्यायत खिडक्या
मुकं झालंय्, बहिरं झालंय् आसमंत
चला, हे जीवन अन् मृत्यू–दोन्हीही नाहीत आजपासून माझे
माझी दृष्टी... माझी वाचाशक्ती... श्रवण... स्पर्श
काही काही नाहीये आजपासून माझं

चला, मीही झालोय् तमासगीर माझ्याच नर्कयातनांचा
माझी दुनिया तमाशा आहे.
मी माझ्यासमोर पाहू शकतोय्
स्वतःला तडफडताना, डोकं आपटताना
अन् इतका संतुष्ट आहे आज, की वाटतंय्,
हा जन्म मिळालाय् मला नुकताच काही वेळापूर्वी
अन् कुठल्या तरी अनोळखी दुनियेतनं आलोय् मी
बरसणाऱ्या ढगांबरोबर...

## □ या नरकात

कुठून आलात तुम्ही ?
अवकाशात लपलेले अदृश्य डोळे पाहतात
पापणी लवते
अन् कित्येक प्रकाशवर्षं होऊन जातात
कयामतला बिलगून परतली तर ही पृथ्वी
एखाद्या सूर्याच्या भट्टीतनं निघणाऱ्या राखेचा फक्त एक कण आहे

कुठून आलात तुम्ही
राखेच्या कणांत तुम्ही काय अन् मी काय
प्रेमाचा सहारा ही हतबलतेची सीमा आहे
आपली धडं कवटाळून आपलं रक्त पिळलं, तरी काय होणार ?
इच्छांच्या तटबंदीनं घेरलेली आम्ही माणसं
कसं दिसेल इतक्या उंचीवरून
हसतायत ? की रडतायत ?
प्रेतयात्रा चाललीय् मुंग्यांची, की एखादी वरात निघालीय ?
क्षितिजाच्या पलीकडं
कागदाची ओझी लादलेले सत्तर उंट
माना खाली घालून चालले आहेत...

शेकडो पिढ्या गुजरल्या...
परमेश्वराच्या डोळ्यांतून जीवनाची एक पेशी
या पृथ्वीच्या आंधळ्या डबक्यात पडली होती
कदाचित तेव्हाच ती सारं काही गमावून बसली होती
शेकडो पिढ्या गुजरल्या...

सारे परेशान आहेत,
की ती पेशी कुणी चोरलीये
प्रत्येकाला संशय आहे, की दुसऱ्यानं आपल्या उरात लपवून ठेवलीये
साऱ्यांचे आत्मे पोकळ नावांच्या कटोऱ्यांमध्ये
पालीच्या तुटलेल्या शेपटीगत
तडफडतायत्...
फडफडतायत्...

तरीच शहरात धुमाकूळ माजलाय्
कोलाहल वाढत चाललाय् गल्लीत
जाळा...
फुका...
उद्ध्वस्त करा...
चिरून टाका प्रत्येक देह अन् आत डोकावून पाहा...
सडकेवर रक्त वाहतंय् , ते चाखा
परमेश्वराची लज्जत येईल कदाचित त्याला...

या नरकात
कुठून आलात तुम्ही ?
हेच का आहे आपलं वतन ?
इथंच का वसत होते पूर्वज आपले ?
इथंच का होते उतरले अवतार ?

आक्रोश आहे आर्त किंकाळ्यांचा
हजारो शहरं उजाड होऊ लागलीत
अवकाशात लपलेले अदृश्य डोळे
पापणीही न हलवता पाहतायत्
किड्यांमध्ये अन् मुंग्यांमध्ये एक घनघोर युद्ध जुंपलंय्
सर्वत्र ढिगारेच ढिगारे होऊन पडलेत
क्षितिजाच्या पलीकडं

कागदाची ओझी लादलेले सत्तर उंट
माना खाली घालून चालले आहेत....

□ निवडुंग

(पॅलेस्टाईनच्या मुक्तिसैनिकांसाठी)

वाळवंटाची कूस
किती हिरवीगार आहे
सर्वत्र निवडुंगांचे उगवून आलेले हात
हातांना
काट्यांनी भरलेली बोटं
काट्यांनी भरलेल्या बोटांना
फुटू लागलेले अगणित हात
हातांना
काट्यांनी भरलेली बोटं

तुम्ही पाह्यलीत का कधी झाडं, ज्यांना भुई नाहीय् ?
आपल्याच शरीरात धावणाऱ्या स्वैर मुळांना
आणि पत्थराच्या धमन्यांना
ठाऊक आहेत
सर्जनाचे खजिने
अन् तुटलेल्या हाताच्या गोठलेल्या रक्तातली
छुपलेली बारूदघरं

हे खुदा,
बनवासी भ्रमंतीची वेळ आहे
तू देऊ केलेली वायद्याची भूमी
बहुधा जवळ येऊन ठेपलीय्

कुणी जगून दाखवावं मरणावर विजय मिळवण्याच्या ईर्ष्येनं
परवरदिगारा,
ही तुझीच कृपा आहे,
की वाळवंटाचं दूध उतरलंय् वावटळींच्या स्तनांमध्ये

ओळखून आहेत खुनशी हवेचं कारस्थान
कदाचित म्हणूनच
इतकं रक्त आज शरीरात बाळगून आहेत
चिरलंत, तर जीवनाचा रस
टपटपा गळेल

कापीत जा
काट्यांनी भरलेल्या बोटांमधनं उगवून येतील
समग्र शरीरं
शरीरांना फुटू लागलेले अगणित हात
हातांना
काट्यांनी भरलेली बोटं...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
रा. क्र. ......
शाखा

## □ मी पाह्यलं

मी पाह्यलं...
बेहद्द यातनांनी बेचैन होऊन
एका निर्जन जंगलाच्या दिशेने मी चालू लागतो...
निबिड अरण्यांनंतर
मोकळ्या माळांवर वाळूच वाळू आहे
आणि हवेत वाळूचे इवले इवले कण झगमग झगमग तरंगतायत्...
अपूर्ण अर्धवट काही झाडं आहेत
अर्धवट अन् पूर्ण काही सांगाडे आहेत जनावरांचे
सारे चुपचाप आहेत
दूर पहाडांच्या मागं तेजाचा लाव्हा उकळतोय्
लाखो किरणांचे बाण तरंगतायत्, फिरतायत् वातावरणात
त्यांच्या तडाख्यात जे जे येतं,
त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या होऊन विखुरतायत्...

हिरवंगार एक झाड आहे
त्याच्या अर्ध्या भागाच्या फांद्या, फळं अन् फुलं
सगळी गळून पडतायत् शिलगून शिलगून
फुलबाज्यांसारखी...
असं वाटतं,
जणू थोड्याच वेळात सारा आसमंत भरून जाईल
जरतारी चम्‌चमत्या जळत्या विझत्या कणांनी
अन् वितळून जातील सारे देह

एक किरण

माझ्या भाळावर लागला होता
विरून गेला
अन् जणू कुणी
माझा हात पकडून मागं खेचून घेतलं मला
एक टोक सुईचं बोचलं अन् खुडून आतच राह्यलं
तेव्हापास्नं माझ्या धमनीधमनीतनं तरंगत तरंगत
आतल्या आत ते माझी चाळणी करून राह्यलंय्...
तेव्हापासून झालोय् मी
एक आक्रंदणारी, आक्रोशणारी बेचैन हवा
मी आपटतोय् डोकं पर्वतापर्वतावर...
माझं घरदार कधीच लुटलं गेलंय्
माझ्या देहाचे तुकडे तुकडे करून
प्रत्येक वारसदारानं आपला आपला हिस्सा वाटून घेतलाय्...

तेव्हापास्नं
किती छोटं वाटतंय् हे जग
कसा मावेन मी त्यात ?
अजस्त्र खडक ओझ्यानं माझ्या ?
फसतायत जमिनीत दलदलीसारखे
कुठं ठेवू पाय ?
कुणावर प्रेम करू ?
कोण साहेल माझी व्यथा ?

तो हात कुठं आहे ?
कसली आहे सावली ?
तू आहेस
मी आहे
माझा मीच माझ्या सोबत नाहीये....

## □ थोतांड

पृथ्वी आवर्तली
हवा बदलली
चला, ऋतु बदलतोय्
सलीम,
आता तू पहाडांवरून उतरून ये

ते बघ, मुंग्यांना पंख फुटलेत
निस्सीम वातावरणात
मृत्यूच्या दरीत
आज इतक्या बेपर्वाईनं उडतायत्, बागडतायत् त्या
जणू संतुष्ट आहेत कोळ्यांच्या जाळ्याजाळ्यांच्या साम्राज्यात

सलीम,
आता तू पहाडांवरून उतरून ये
तुझा दूरचा आवाज कसा प्रतिध्वनी होऊन
परत आलाय्
कदाचित वस्त्यांमधली सारी बारूदघरं सर्दून गेलीत
कुठलंच हत्यारही तंदुरुस्त नाहीय्
तीक्ष्ण हात
काटे
नांगी
नख्या
संरक्षणाची सारी सामग्री जणू हिरावून नेलीय्

अंधाराच्या आश्रमांमधून
सामीरीच्या जादूनं सारे भारले गेलेत आज
हात, पाय, मती—सारं लुळं पडलंय्
सोन्याचा गोऱ्हा बोलू लागलाय्

म्हणूनच जालिमांशी वेदनेचं नातं जोडून
परमेश्वराच्या कुशीत आरामात झोपतात
जणू सारे प्रेषित

दगड उचलून कुणी फेकून मारा त्यांना
उचलून चुंबन घेतील त्या दगडाचं

हे कुणाचं दुःख भोगतात ?
हे कुणाची जाणीव ठेवतात ?
स्वतः आपल्या मरणाच्या नजाऱ्याची जखम देतात
श्वापदांच्या नजरेत भरण्यासाठी
अन् दिव्य तेजाची आस बाळगतात

सलीम,
आता तू पहाडांवरून उतरून ये
तुझी मर्म तूच जाणतोस
हे सारं काही झूट आहे
एक ढोंग आहे
आमच्यांत कुणी
अय्यूब आहे, ना बुद्ध आहे, ना येशू आहे
बस्स, एवढंच आहे
आमचा स्वतःतला सैतान मरून गेला आहे

## □ खेळणी

झन् झननूझन् नाचतात बाहुल्या
ठुमकत ठुमकत देतात टाळ्यांवर टाळ्या माकडं
तडातडा गोळ्या डागत राहतो पुढं सरसावून इंग्रज
रानटी अस्वलं हिसळतात, घुसळतात
उन्मत्त हत्ती मस्तकं हलवीत झुलतात...
जत्रेतल्या एका दुकानात सारेच होते हरवलेले आपल्या तंद्रीत...
दिवसरात्रीच्या चाव्या उलट्या फिरत उलगडत राह्यल्या...

आणि प्राण झाले स्वार कळीच्या घोड्यांवर
अन् उडत उडत घनगर्द वनराजींवरून
पोहोचले जादूनं भारलेल्या एका नगरीत...
एकाएकी असं वाटलं,
की सारे आले परतून माघारी आपल्या मुलखाला...
दिवसरात्रीच्या चाव्या उलट्या फिरत उलगडत राह्यल्या...

नवजात अन् इवली इवली फुलं
आपापली पाटीदप्तरं उचलून
बिनधास्त पुढं सरसावली
वर्षमहिन्यांच्या भिंतीतल्या प्रत्येक फटीतनं बाहेर पडून
एकामागून एक समोरच्या रांगेत येऊन मिळाली...
दिवसरात्रीच्या चाव्या उलटया फिरत उलगडत राह्यल्या...

## □ तफावत

त्या दिवशी ही दुनिया किती वेगळी होती
जणू अवखळ नदीच्या मऊशार चमचमत्या
ओल्या वाळूवर कुणी अनवाणी चाललंय्
निद्रेच्या मखमली बाहूंत उमलत्या फुलांसारखी
मृदु...कोमल...लवलवती...
प्रत्येक रस्ता
पाऊलवाट
एक निसटतं वाहतं स्वप्न
दारं...भिंती
वितळतं मेण...
दुश्मन, दोस्त—सारेच उत्साहाचे हालते-फिरते आकार...
जीवनाचा एक एक सुटा भाग
जगताना
स्निग्धतेत निसटताना
घासत नव्हता, की नव्हता होत आवाज
जणू ओठांशी ओठ जुळावेत...
स्वप्नांच्या उत्कट भराऱ्या—ज्यांत एक पीसही हलू नये
अन् एकाच झेपेत मैलोन् मैल दूर तरंगत
आपण मुक्कामाला जाऊन पोहोचावं...

विचार केला, तर वाटायचं
मी लाकडी घोड्यावर स्वार झालेला एक चिमुकला सम्राट आहे
अन् आपली लवूलवूती तलवार चालवीत
मुलूख आपला दालनादालनानं वाढवतोय्

साऱ्या विश्वाचा विस्तार सीमित झालाय् अंगणात
माझा देव खुद्द माझा दोस्तय्
माझा समवयस्क आहे
माझ्या सोबत आहे
त्याचे देवदूत माझ्या फौजेत सामील आहेत...

पण
ज्या दिवशी मला पहिल्यांदा असं वाटलं,
की
फुलं उमलली आज, तर उद्या ती कुठं असतील ?
माझ्या प्राणाच्या सन्नाटयात वसलेले राग
कसे जगतील दुःखाच्या कोलाहलात ?
कसा असेल उद्याचा दिवस ?
माझ्या प्रेमाचं काय होईल ?
पहिल्यांदा माझ्या या मनानं विवंचनेचं फळ चाखलं
अन् त्या दिवशीच माझ्या देवानं मला एकाकी सोडून दिलं...

## □ स्पर्शदंश

हाच ऋतु होता...
हेच रंग...
हीच फुलं...याच भिंती...
अन् याच तसबिरी होत्या कदाचित
हेच पडदे होते, नाहीतर असेच पडदे असावेत...
ज्यांच्या सळसळीत नक्कीच असावी कुठली तरी जादू...
कशी गूढ गोष्टय्,
की मी इथंही होतो अन् तिथंही
अन् तिथं असा,. की इथल्यापेक्षा तिथंच अधिक...
आत्ता परका
तर क्षणात ओळखीचा
साऱ्या गोष्टी तशाच, प्रत्येक वस्तू तीच
फरक एवढाच, की प्रत्येक वस्तू सारखेपणात पुन्हा एकदा तरुण...
जादूनं भारलेली एक वेळ...
एक अवकाशहीन अवकाश...
अवकाशहीनतेतून अवकाशात जावं,
तसं गूढ काहीतरी पडदे सळसळताच झालं...
भूकंपांना जाग आली
अन् खजिन्यांनी खचाखच भरलेल्या तळघरांनी तोंडं उघडली
सर्वत्र सोनंच सोनं विखुरलं
अन् सोन्याच्या राशींच्या तळाशी
देहाचा एक सोनेरी गुलाब
तरारलेला...फुललेला...
तोच अकारण भरवसा पहिल्यासारखा

पाकळ्या पाकळ्या विखुरल्या, तर
मातीतनं उठावा सुगंधाचा दरवळ...

व्याकूळ होण्याची अधीरता तीच
व्याकूळ होण्याच्या इच्छेचं पडद्यामागचं दडपणही तेच
दबलेल्या नीच वासना
निष्ठावंत त्वचा–
जिच्यावर आहे माझा फार भरवसा...

मी मात्र
दूध पोळलं
आता ताकही फुंकून पितो
कारण कुशंका या कुशंकाच असतात
न जाणो,
बारूदभरल्या एखाद्या स्वप्नाचा स्फोट व्हायचा कुठं...

## □ लाट

तू आहेस तो किनारा–
ज्याच्यामुळं
माझी लाट लाट होते एक समुद्र...
वादळ पेलण्याची
वादळातनं तृप्ती मिळवण्याची शक्ती
सारं काही तुझ्यामुळं आहे...
पण
थोपवून धर लाट
थोपवून धर माझी लाट
नाहीतर
पसरलेल्या दिशांच्या सीमांच्या पलीकडं निघून जाईन...
विखरून जाईन...

## □ प्रतिबिंब

प्रतिबिंब, जे बुडून गेलं...
आरशात नाही
डोळ्यांत उतरून पाहा...

## □ आठवण

मुलायम रेशमासारखी विणलेली शांतता
जागोजागी पुन्हा उसवू लागली
देहाच्या घरट्यातनं पाखरं उडाली
उष्ण, ताज्या रक्तात न्हाऊन
पंख फडफडू लागली
किती तरी वेळ रंग उडत राहिला...

## □ सुगी

आज
तू आहेस माझ्या आठवणींचा ठेवा
कापणी झालेल्या पिकाचा मालक आहे मी...

□ मृत्यूप्रमाणं

माझ्यात
तू वाढत जा मृत्यूप्रमाणं...
जवळ ये
क्षणाक्षणानं जवळ...

## □ तुझ्या बरोबरचे प्रवास

१.

गारठ्याची रात्र
आगगाडीच्या खिडक्यांमध्ये गारठलेला काळोख
काळोखाच्या आरशाच्या तळाशी
एक अवकाशहीन वातावरण
किती खोल
किती अफाट
माझ्या आवाक्याच्या पलिकडलं
माझ्या प्राणाला घेरून आलेलं...

वृक्षावृक्षांतनं
रानावनांतनं
दऱ्याखोऱ्यांतनं वाहणारं
प्रवाही रक्त माझ्या देहाचं
होतं एक लाट–
जिला किनारा नाही...

प्रवाशांच्या गर्दीपासून अलग
दूरवर
तुझ्या माझ्या अनिर्बंध आकृत्या–
ज्यांना माझं भान नाही... तुझी पर्वा नाही
दूरदूर पंखापंखांनी पसरणारं
त्यांचं स्वतःचं अस्तित्व...
त्यांची स्वप्नं...

एका किरणाच्या स्पर्शानं हिरवे तांबडे निळे नारिंगी
किती रंग
कशाकशा अधूऱ्या प्रतिमा
पापणी लवली अन् जुळल्या
पापणी लवली अन् वितळून गेल्या
अन् मग रात्रीची बिछायत उलटली...

२.

वर्षभराच्या प्रवाशांनी
जुने चेहरे भिरकावून देऊन नवे लावून घेतलेत
किती भाग्यवान् आहेत
की त्यांच्याजवळ कुठलाच आरसा नाही
त्यांच्यासाठी काळ हा फक्त काळ असतो
कुठलाच क्रम नाही
चांगलं नाही, वाईट नाही
किती भाग्यवान् आहेत
एका वर्षात सगळे बदलले...
...रानाची कूस पेरणीची वाट पाहतीये
मागल्या पिकाची कापणी झाली ..
रात्रीची बिछायत उलटली...

३.

सलीम,
एक अनादि किंकाळी
'— रात्रीची बिछायत उलटली...'
चल, गोळा करून ठेव
काचेतून बाहेर दिसणाऱ्या

गाडीतल्याच मिणमिणत्या प्रतिमा...
पसरल्या पंखांनी दूर पांगणारे ओळखीचे चेहरे...
चल, गोळा करून ठेव
अश्रूंचा थेंब थेंब
तुझ्यावर ओलाव्याचा उपकार करणाऱ्या डोळ्यांमधून
थेंब थेंब अश्रूंचा
चल, गोळा करून ठेव
जपलेल्या या थेंबांची पुंजी नसेल जवळ,
तर कसा उचलला जाशील आपल्या कबरीतून
कयामतच्या दिवशी...?

कसं दुःख आहे हे ?
कसं दुःख आहे ?
माझ्यापासून माझ्यातच
किती विलग झालोय् मी !
कसं दुःख आहे हे... ?

## ▢ माणसं मरणालाच मीलन का म्हणतात ?

अनेकदा अशा एकाकीपणात काळोख बोलू लागतो
अन् जिभेवर अचानक बदलते ऋतूंची चव
आपल्याला असं वाटतं, की
कुणीतरी दुसरंच आहे कदाचित
पण कोण ?
सर्वजण मरणालाच आपलं मीलन म्हणतात
सर्वजण मरणाच्या प्रतीक्षेत असतात...

मी
आणि फक्त मीच बघितलाय्
तुझ्या श्वासांत
माझा दाटून येणारा पूर–
जो असतो
आपलं दैव सुरुवातीपासून शेवटपर्यंत;
जो असतो प्रारंभ आणि अंत–
माणसं ज्याच्यासाठी मरणाच्या प्रतीक्षेत असतात...

माणसं निष्कारण मरणाच्या प्रतीक्षेत का असतात...?
एखादा खडा बुडतो डोहाच्या तळाशी
तेव्हा एक बुडबुडा वर येतो
किती अस्वस्थ
पाऱ्याप्रमाणं चंचल
टाकतो तळाच्या गुपिताची गुळणी पृष्ठभागावर
अन् फुटून जातो...

तेव्हा पाण्याचं चुंबन घेऊन सारे वारे म्हणतात :
काहीच नाही
कुठल्याही तळापाशी, कुठल्याही गहराईत कसलंच गुपित नाही
मरण आहे एक निष्फळ दुःख...

माणसं निष्कारण मरणाच्या प्रतीक्षेत का असतात... ?

ग्रंथालय ठाणे
शाखा (स्थळ प्रत)

□ फ़िराक़ गोरखपुरीसाठी

ऐकलंय्,
की उंच उंच पर्वतांवर
एक म्हातारा गंधर्व
गोड गोड गाणी गातोय्
माणसं, झाडं, पर्वत, पाखरं
सारं त्यानं मंतरून टाकलंय्
त्याला वाटेल तेव्हा
तो चंद्र-चांदण्या तोडतो
फुलांशी नातं जोडतो
धुळीनं भरलेल्या मळकट पृथ्वीवर तेजाची एक चादर पसरतो…

ऐकलंय्,
की जादूभऱ्या या गाण्यांनी
मनांच्या जखमा भरून येतात
जशी पतझडीच्या ऋतूत
खोल आंधळी तळी, डबकी
गळणाऱ्या पानांनी अलगद झाकली जातात…

आम्ही या आंधळ्या डबक्यांत उगवणारी रोपं
सरस्वतीचं ओझं आपापल्या माथ्यांवर पेलताना
निळ्या विषारी पाण्यात
स्वतःच आपल्या दलदलीत
जमीन शोधतोय्…

आम्हांला काय कळणार :
पर्वत काय आहे ?
पर्वताची उंची काय आहे...?
आमच्या कानांवर येता येता
जादूनं मंतरलेली ती गाणी
होऊन जातात विसरलेली धूसर एक कहाणी...

## □ असो

असो,
तू बंद कर सगळी दारं
अन् थांबव हे वारे
हे वारे प्राणाची पोकळी भरण्यासाठी येतात
अन् आणतात आपल्याबरोबर तुझे श्वास...

या वेळी
माझ्या धमन्यांमधून रक्ताऐवजी वाहतंय् ते पाणी—
जे असतं आतल्या आत इच्छा कोंडून धरणाऱ्या झाडांचं दैव...

माझ्या वादळाच्या लाटा
झाल्याय्त कुठल्याशा बर्फाळ शिखरांवरला मजकूर
हा मजकूर वाचता येतो आता फक्त अशाच देवदूतांना—
जे उतरतही नाहीत या दुर्दैवी पृथ्वीवर...

असो,
तुला जे हवंय् ,
जसं हवंय् ,
तसंच होईल...
मी चाललोय् माघारी एखाद्या भोवऱ्यासारखा
त्या समुद्रात—
ज्याच्या तळाशी बुडून कायमचे हरवतात सारे खजिने...

## □ दिलासा

सांग,
की कदाचित आमच्या मांसात खोल कुठंतरी
रक्ताच्या पेशींमधून
अन् धुग्‌धुग्‌त्या धमन्यांमधून
डोळा होऊन अजूनही कुणीतरी जागं आहे,
जे होतं कधी सत्याच्या कबरीवरील वेताळ,
तर एखादी आकृती होऊन कधी उजळून जातं अंधाऱ्या आरशात
कधी होतं अनंताच्या समुद्राची हाक
तर कधी मृत्यूच्या श्वासाची झुळूक
किंवा येतं कधी प्रेमात वाट्याला पराभव होऊन
अन् जोडतं आम्हांला अजूनही विश्वाशी...

सांग,
की डोळा होऊन अजूनही आमच्यांत खोल जागं आहे
असं कुणीतरी
ज्याच्या कदाचित एका स्पर्शानं मिळतं
आमच्या आत्महत्येला बलिदानाचं नांव...
सांग,
की ते जेही असेल,
जसंही असेल,
जिवंत आहे आज अजूनही आमच्यांत...
सांग,
मग हे सारं खोटंही असेल,
ते खोटंच पुन्हा सांगून
मला दिलासा दे...

□ थोडा वेळ थांब

सारे आराखडे अर्धवट पडलेत
बरीच काटछाट अजून करायची राह्यलीय्
जमवणं, जुळवणं राह्यलंय्
बऱ्याच गोष्टींची रचना अजून करायची राह्यलीय्
अवजारं, हत्यारं इतस्ततः विखरून पडलीत

थोडा वेळ,
फक्त थोडा वेळ
फक्त थोडा वेळ थांब,
की कदाचित काही काम जमून जाईल
असं काम एखादं, जे काही कामी येईल
येणाऱ्यांच्या श्वासांत
चार-दोन श्वास माझेही सामील होवोत
अन् मला काही पावलं निष्प्राणही चालता येवो

नंतर तर मी स्वतःच म्हणेन
चल,
दाखव मला वाट
आपण बरोबरच जाऊ
सारं काही इथंच सोडून देईन–
जशी मुलं खेळण्यांचे ढीग विखुरलेले सोडून
झोपेत बुडून जातात
सारं काही इथंच सोडून देईन
सारं काही इथंच सोडून देईन...

□ बिनफळाचं झाड

निद्रेपासून नीघ
चल, सहन कर काळ
रात्रीच्या डोळ्याला डोळा भिडव

निद्रेपासून नीघ
निद्रेत एक पाठलाग चाललेलाय् सतत...
क्षितिजांच्या पलीकडं
सातासमुद्रांपलीकडं
डोलणाऱ्या ढगांत वाहणाऱ्या हंसांसारखे
माझ्याच चेहऱ्याचे कित्येक चिमुकले
चोरून चोरून बघतात माझ्याकडे
अन् बसतात लपून...

विश्वाचा हा सारा खेळ
जणू सतत चालू आहे एका लखोट्यावर
जो उलगडतोय्, गुंडाळला जातोय् दर निद्रेत...

निद्रेपासून नीघ
चल !
बीजं उमद्या स्वप्नांची
दफन कर वांझ आठवणींमध्ये कुठंतरी
काही उगवत नाही, की फळत नाही इथं...
फक्त सावल्या आहेत, सावल्यांची घनगर्द रानं आहेत...
शिसं वितळून ओता माझ्या कानांत

कुठवर ऐकू माझीच गूंज...?

निद्रेपासून नीघ...
पण थांब...
कोण आहे...?
...ही दुहेरी स्पंदनं डाव्या फासळीपासून का बरं आलीत वर ?
दातांनी बोटाला चावा घेऊन बघावं,
की निदान भळभळत्या जखमेच्या ओटीत तरी दिसेल
माझ्याचसारखा चिमुकला चेहरा सुषुप्तीतला...
निद्रेपासून नीघ...
चल, सहन कर काळ...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## □ ....आणि एक फळ पडलं माझी लाडकी बाहुली होऊन

( माझ्या सल्मासाठी )

आजच्या नंतर जर जगायचं असेल, तर
जे काही आहे आजचं,
त्या साऱ्याला तिलांजली द्यावी लागेल...
एका आभासात
एका डुलकीत
चाळणी चाळणी झालेल्या या जखमी देहाला
आपल्या रक्ताच्या धगीत जळून जाऊ दे
ढळून जाऊ दे...

हुरळत हुरळत
सळसळत्या पिकासारखं लवलवत
बाहेर ये इच्छांमधून
आपल्यातल्या आपल्यामधून पुढं वाढत, पसरत जा
शिवारांच्या पार पलीकडं उतर
आणि बघ
आसमंत कसा मोकळा आहे
जणू प्रत्येक वस्तूत लपलेलंय्
येणाऱ्या दुनियेचं बीज
बीजात झाडं
सोनेरी झाडं
झाडांच्या ढोलीढोलीतनं
पाखरं अंडी उबवतायत्
ऐक, अंड्यांच्या आवरणांआडून येऊ लागलेली

बिनआवाजी सुरांची गुणगुण
अन् विणू लाग त्या सुरांनी तुझी गाणी...
आजच्या नंतर जर जगायचं असेल, तर...

□ पुनर्जन्म

( माझ्या आईसाठी... )

आज
ऋतूतल्या पहिल्या सरी किती सुगंधी आहेत
कौसरच्या कुंडातलं अमृत कोण शिंपडतंय्
उदाच्या धुपाऱ्यात...?

जाणाऱ्यांचे वास साऱ्यांना ठाऊक आहेत
पण आपल्या मुठीत वास कसे धरून ठेवता येतील?
त्या आधी तर कदाचित सारेच त्यांच्यांत मिसळून जातील...

आत्ता ती इथंच तर होती
ओळखीची होती चाहूल... आत्ताच तर ऐकली होती
पापणी लवते, न लवते, तो नाहीशी झाली

घनगर्द झाडीतून ठिबकणाऱ्या चांदण्यात
ढगांच्या आकारात
सामील झाली...

आज एवढंच शक्य आहे
आपल्या अंगणात खेळणारं, बागडणारं कुणी निरागस मूल
आपल्याकडे परत यावं
डोळे भरून पाह्यलं, तर सगळ्यांनीच चमकून ओरडावं—
अरे,
हे तर सारं तेच आहे

तोच गंभीर चेहरा
पाहण्याची ढब तीच
तेच रंगरूप
कच्चे दात पडून पुन्हा नवे येऊ लागलेले
पिकलेले केस नवीन मुळं धरू लागलेले

असं वाटतं,
जाणाऱ्यांना आपण परमेश्वराकडून हिरावून घेऊन
परत आणलंय् अंगणात आपल्या
आज ती खेळत, बागडत फिरू लागलीत...

## ▢ The Misfit

( माझ्या भावासाठी... )

१.

काळाच्या चाकावर
माणसं घडत गेली
बिघडत गेली
तो घडलाच नव्हता,
तर बिघडणार कसा ?
जडलाच नव्हता,
तर उजडणार कसा
जगलाच असेल, तर कदाचित एकटाच जगला तो
किंवा मग जगलाच नाही
गेलाच असेल, तर कदाचित एकटाच गेला तो
किंवा गेलाच नाही मग
तो होताच कुठं,
म्हणून निघून गेला ?
जीवनात असलाच, तर तेही सावल्यांमध्येच असायचा...
पुराणकथांमधून वाचलं किंवा ऐकलं होतं,
जणू तसंच
दक्षिणेचा प्राण असलेल्या ऊर्वशीनं
त्याला जाण येताच बोलावून घेतलं होतं
अन् सांगितलं होतं निळ्या डोळ्यांनी,
की माणसाला दिलीच गेली नाही ती आग,
जी जुळवू देईल त्याला नातं आभाळात राहणाऱ्यांशी

त्या पवित्र ज्वालेचा शोध वर्षानुवर्षे तो घेत राह्यला...

आमच्यांत होता,
तेव्हाही आमच्यांत असून नसल्यागत असायचा
दिवसरात्रीच्या तटांवरून पलीकडं डोकावून
आम्ही त्याला पाहून घ्यायचो
कधी जवळ आलाच, तर वाटायचं,
की त्याचे कान एकीकडे आहेत, तर डोळे अजून कुठं तरी
मनात काहीतरी चाललेलं आभाळाच्याही पलिकडलं
नाहीतर दूर पाताळातलं काहीतरी...
आम्ही बघायचो
पाण्यात बुडताना माणसं जशी बघतात एकमेकांकडं,
तसं...

आम्ही पाह्यलंय् त्याला
स्पर्श केलाय्
बोललोय् त्याच्याशी
विसरून गेलेल्या गोष्टीतल्या पात्राला
आपण स्पर्श करावा किंवा त्याच्याशी बोलावं,
तसं.
आम्हांला आठवतंय्
आम्ही भेटलेलो आहोत...

तो मात्र
त्यानंच बनवलेल्या वाटेला लागला
पवित्र ज्वालेचा शोध घेत राह्यला
आपल्या वडीलधाऱ्यांना
—सावली देणाऱ्या पिंपळाच्या झाडांना
बहीण-भावंडांना
—लाजाळूच्या रोपट्यांना

वर्षानुवर्ष जाळतच राह्यला
कोण जाणे, कशी निर्माण झाली ती ज्वाला
अन् मुक्त झाला तो...

२.

काळाच्या चाकावर
माणसं घडत गेली, बिघडत गेली
तो एकटा मात्र
फसून बसला चाकाच्या आसात
पुरला गेला आपल्यातल्या आपल्यातच

आपल्याच फेऱ्यात होतो आम्ही
शोधतच राह्यलो
सारंच काही अचानक घडलं
कुणी थांबलंही नाही क्षणभरदेखील
सगळ्यांनाच मुक्कामाला पोहोचायची घाई होती
कबरीचं बोलावणं होतं
शेवटचा प्रवास सर्वांच्याच समोर उभा ठाकलेला होता...

वरवरची चौकशी
धावत्या टिपणी
सकाळपासून संध्याकाळपर्यंत
उदासीन शोध
जणू मुठीत कुणी वारा धरून ठेवू पाहतंय्...

उगीच चालता फिरता
रस्त्यातनं जाणाऱ्या प्रत्येक माणसावर निसटती नजर,
की निदान ओझरता तरी दिसेल तो कुठं
त्याच्या शोधात

आम्ही आतल्या आत शिलगत राह्यलो
—आपल्यातल्या उपजत निसर्गापुढं आपणही मजबूर असतो—
पण आग भडकली
अन् असे भ्यालो
जसे चोरी करताना पकडले गेलो....

प्रत्येकाच्या बुद्धीच्या आपल्या आपल्या आंधळ्या विहिरी होत्या
अन् आंधळ्या विहिरींमधून
त्यांचं आपापलं मायाजाल होतं
अन् मायाजालात
त्यांच्या पऱ्या होत्या
त्यांचे राक्षस होते
जे रस्ता अडवून दरम्यान उभे होते
कुणालाच फुरसत नव्हती...

छेडला गेलेला एक नाग
फूत्कारत
आपल्या प्रत्येक चाहत्याला दंश करून
एवढंच विचारायचा :
माझ्या मस्तकात हे जहर कुणी भरलंय् ?
बापजाद्यांनी ?
बहीण – भावंडांनी ?
बेगडी बायकोनं ?
की मग कुणा ऊर्वशीनं ?
माझ्या मस्तकात हे जहर कुणी भरलंय् ?

सगळेच त्याला झिडक्या देत पुढं निघून गेले
दारू पितो
पागल आहे ..
कुणातच ही हिम्मत नव्हती

की खानदानी बढाईच्या शिडीवरून उतरून खाली यावं...
पाताळातले लांडगे रात्रंदिवस
त्या पोरक्या निरागस जीवाचा छळ करत राह्यले...
तो तर केवळ एक मंतरलेला गुलाम होता
एखाद्या कैद भुतासारखा
बाटल्याबाटल्यांमधूनच
लपत छपत फिरला
अन् अखेर धूर होऊन गेला...

मिरचीच्या धुरीसारखा एक लोट धुराचा
डोळ्यांत वळणावळणावर
दाटून येतो
अन् एकाच अश्रूनं धुतलाही जातो...
हे दुःख
अजब दुःख आहे
रडण्याचं सुखही मिळत नाही
नाहीतर वेगळंच आहे मग काहीतरी
अंतर्मन आपलं वठल्या झाडागत श्वास कोंडून चुपचाप आहे
संतुष्ट आहे...
चला,
चांगला बहाणा मिळाला...
खानदानी वस्त्रांवर आता कसलाच डाग नाही...
अवशेषमय हवेलीतलं हरेक काम आता प्रतिष्ठेनं पुन्हा सुरू आहे.
सारा कारभार रीतिरिवाजांनी पुन्हा एकदा परिपूर्ण आहे...
आणि आम्ही सगळेच
हजच्या पाच यात्रांच्या आशीर्वादात
खुशाल अन् सुरक्षित आहोत.

□ हॅम्लेट

१.

चालत राहा
उगाच सोबतीसोबतीनं
निःशब्द
चालत राहा...

नरकांचे क्रम
कुठंकुठं जुळलेले
काही ठाऊक नाही...
आगीच्या झळांपासून दूर दूर
वनवासी भटकंतीच्या वाटा बदलत बदलत
निःशब्द चालत राहा...

प्रेषितांची गोष्ट वेगळी होती
काळानं त्यांना साथ दिली
त्यांना सारं सोसता आलं
त्यांच्या माथ्यांवर थोरवीचं ओझंच इतकं होतं,
की ते जमिनीला जडून राहू शकले...
ते ज्ञानी होते
ज्ञानाच्या हिमतीपोटी आपल्या आपल्या भूमिकांवर अडून राह्यले
त्यांची गोष्ट वेगळी होती...

तुरुंगाच्या अंधाऱ्या कोठडीत

कोळ्यांसारखं नका विणू तत्त्वज्ञानांचं जाळं
चालत राहा...
तंतूतंतूत घोंघावू लागलेत
स्फुंदणारे, मरणारे शब्द...
काही नाही...
आमची विचारशक्ती
आमचं ज्ञान
काहीच नाही...

अवचित उघड्या राह्यलेल्या झरोक्यांमधून
निद्रेला दिसतं ते सारं
सर्व प्राणिमात्रांना
अरण्यातल्या झाडांना
सूडाच्या देवदूतांना
जे उपजतच असतं ठाऊक,
की
कोण आम्हांला लांडगा बनवून राह्यलाय्...
खा...
रोज एकमेकांना लांडग्यासारखं खा...
जो लांडगा शेवटी उरेल,
त्याला ज्ञान प्राप्त होईल...
त्याला उमजेल परमेश्वरी कारभाराचं रहस्य...

२.

काय आमची मनं, बुद्धी झालीत मोहोरबंद
अन् आलेत डोळ्यांवर पडदे,
की म्हणूनच नाहीये कैद्यांमध्ये दर्दही एकमेकांच्या दुःखाचं...?

आमच्याहून बरी आहेत मग ती माणसं,

ज्यांच्यांत हिंमत आहे
आणि
जी आपल्या कणाकणाच्या देहाची ढासळणारी वाळू
दोन्ही मुठींमध्ये भरभरून घेत मारतात फेकून मृत्यूच्या तोंडावर
अन् म्हणतात :
सांभाळ हे लक्तर तुझ्या मालकीचं...
या क्षणी
आम्ही असतो आमचीच सजा...
आम्ही असतो आमचाच मोबदला...
आम्हीच असतो आमचे परमेश्वर...

## □ हॉस्पिटलमधून घरी परतल्यावर

पंधरा दिवस आजारपणाचे असे गेले
ज्यांच्यांत काही परस्पर संबंधच नव्हता...
एक एकाकी दिवस पसरत जायचा
तेव्हा कुठं दुसऱ्या एकाकी दिवसाला स्पर्श करायचा....
सावकाश विटेवर वीट चढत गेली
माझ्या चहूबाजूनं भिंत रचली गेली...

पंधरा दिवसांनी कुठं हा कारावास संपला...
परत आलो माझ्या जगात अन् बघितलं,
तर सारं काही पडलेलंय् तसंच
जसं सोडून गेलो होतो...
...टेबल तसंच तिरपं ठेवलेलं...
रॅकमधनं एक पुस्तक काढलं होतं,
ते तसंच उघडं पडलेलं...
उन्हं
उतरती उन्हं
माझ्या कपाटाच्या दारावर अर्ध्यावरच येऊन थांबलीत
आता इथनंच जातील ती माघारी
जणू त्यांच्या हद्दी सदैव ठरलेल्यायृत...
माझ्या असण्या-नसण्यानं कसलाच फरक पडणार नाहीय्...
खिडकीतनं पुन्हा तीच हवा परत आलीये,
जी माझा श्वास होऊन यापूर्वीही माझ्या शरीरात पोहलेलीय्
गेल्या पंधरा दिवसांत कदाचित ही हवाच
माझ्या पूर्वजांच्या सांत्वनाचा आधार झाली असेल...

माझे पूर्वज...
ते संतुष्ट आहेत, की त्यांच्या अशरीरी अस्तित्वाला
आता माझ्या फुफ्फुसांनी घेता येतोय् श्वास
अन् आजही माझ्या माध्यमातनं ते
या जगात अस्तित्वभूत आहेत...
पण आता त्यांच्या वंशवृक्षाचा विस्तारही दूरवर पसरलाय्...
त्यांच्या अस्तित्वाचं या जगातलं सातत्य
माझ्या असण्या-नसण्यावर आता अवलंबून राह्यलेलं नाहीये...

गेल्या पंधरा दिवसांच्या माझ्या गैरहजेरीनं
फक्त तेच राह्यलंय् खोळंबून,
जे माझं स्वतःचं असं होतं...
पॅडमधनं एक अपुरं पत्र अजूनही डोकावतंय्
हे पत्र मी तुला लिहिलं होतं...
खोलीच्या कोपऱ्यातली दबलेली सुनसान शांतता
माझी सारी गुपितं जिला सदैव माहीतायत
माझ्या खोलीच्या कोपऱ्यातली ती दबलेली सुनसान शांतता
पुन्हा परत आलीये
हलक्या आवाजात ती मला म्हणतीये :
आता तू या पत्रापेक्षा वयानं पंधरा दिवस मोठा आहेस
पंधरा दिवसांपूर्वी
या पत्रात लिहिलेल्या साऱ्या गोष्टी किती खऱ्या होत्या
ते सत्य अटळ आहे
ते तिथंच उभं आहे
माझ्या साऱ्या कवितांसारखंच...
माझ्या कविता,
ज्या मी जगलेल्या क्षणांच्या थडग्यांवरल्या कोरलेल्या ओळी आहेत,
त्या जिवंत आहेत
चिरंजीव आहेत...
माझ्या असण्या-नसण्याशी त्या बांधलेल्या नाहीत...

## ☐ व्हायरस

काळाच्या मुक्तिदात्या,
तूच सांग, काय झालंय् हे
जिभेवरली चव अशी अचानक का निघून गेलीय्...?
जरा वेळ डोळा लागला
अन् माझ्या देहाची राख कशी अशी झडली...?

ऐकलंय्
दूर देशांतून
कुठलंतरी व्हायरस आलंय् आमच्या किनाऱ्यांवर
त्याच्या झगमगत्या यातूच्या विधीत
अमृत अन् विष एकच आहे...
आता कशातच राहली नाहीय् एकमेकांना सांधणारी साखळी
कुठल्याच औषधाचा कोणत्याच व्याधीशी
कसलाही संबंध उरला नाहीय्...
आम्ही हवेच्या झुळकीझुळकीतनं
व्याधी ओढतोय्, सोडतोय् श्वासासारख्या
रक्ताचा एक एक थेंब जखम झालाय्
धमन्यांतनं तरंगतायत जणु शाप सलणाऱ्या कुसळागत...

काळाच्या मुक्तिदात्या,
तूच सांग, काय झालंय् हे...?
पिशाच...
आमच्या ज्ञानाच्या दिव्याच्या धुरातनं
वर येणारं पिशाच

का बरं बिथरलं ?
धूर धूर पांगलाय् सर्वत्र
ऐका...
किचाळतंय् ते...
‘ काम...
काम...
काहीतरी काम द्या ...’
काही नाही
जा,
चालता हो किनाऱ्यांच्या दिशेनं
थोपव, शक्य झालं, तर या नव्या आपत्तीला...
नाहीतर मग
परमेश्वराच्या अंतिम पराभवापर्यंत चाळत राहा समुद्राची वाळू...

## □ टेस्टट्यूब बेबीज्

दृष्टिहीन माझे डोळे
खिळलेले रात्रीच्या खडकांवर
ज्यांच्या एकेका थराआड लपलीत कित्येक युगं
कित्येक स्वर्ग अन् नर्क गोळा होऊन गेलेत थिजून...

चंद्राचे सारे मारेकरी
आपल्या बळीच्याच कुशीत तोंडं लपवून
झोपी गेलेत...
आता दोष कुणाला देऊ... ?

नुकताच माझ्या समोरनं वाहत गेला
काळाचा ज्वलंत लाव्हा
अकारण थिजला
आणि आग अन् राख यांच्या दरम्यान
गिरक्या खात राहिला...
पांगला गार अन् वितळलेला धूर...
चेहऱ्यांच्या प्रतिमा झाल्या
शरीरांच्या सावल्या झाल्या...

कुणी जुल्म केला होता ?
कुणावर जुल्म झाला होता ?
हताश बुद्धी विचारहीन भरकटतच राहिली
अन् मग अकारण थांबली...
माझे साथी नर्काचं खाद्य होते, की काय,

म्हणून निघाले होते शोधायला ?
की
कूस पृथ्वीची चिरली, तर काय होईल...?
बीजात किती उरलाय् रंग बापाचा...
रक्तात प्रेयसीच्या
कोणकोणत्या प्रतिस्पर्ध्यांच्या आहेत सावल्या...?

साऱ्या विश्वाची गुपितं शोधून काढल्याच्या आवेशात
परतले सर्वजण
अन् लक्षात आलं त्यांच्या,
की
सर्वजण झालीत आपल्याच प्रयोगशाळेतल्या आपल्याच टेबलांवर
टेस्टटयूब्ज्‌मध्ये चुळबुळणारी बाळं...

टेबलांवर चुळबुळणाऱ्या
या टेस्टटयूब बेबीज्‌ना कोण करणारंय् वारस म्हणून आपलंसं...?
की ती तर होती खुद्द परमेश्वराची मुलं
अन् आली होती जन्माला
क्रूसावर चढण्यासाठीच ?

त्यांच्यांत नव्हतं उरलं काळाला थोपवण्याचं त्राण
उरलं होतं थोडंसं धाडस
काळाचा घोडा वेगानं पिटाळत फिरण्याचं...
वेडे पीर वेगानं घोडा पिटाळत फिरत राह्यले
उघड्या पाठींवर कठोर आसूड विजेचे बरसत राह्यले...
पळत राहण्याशिवाय गत्यंतर नव्हतं
पळता पळता थकून गेले...

हे परमेश्वरा,
माझे साथी तर निष्पाप होते

□ टेस्टट्यूब बेबीज्

दृष्टिहीन माझे डोळे
खिळलेले रात्रीच्या खडकांवर
ज्यांच्या एकेका थराआड लपलीत कित्येक युगं
कित्येक स्वर्ग अन् नर्क गोळा होऊन गेलेत थिजून...

चंद्राचे सारे मारेकरी
आपल्या बळीच्याच कुशीत तोंडं लपवून
झोपी गेलेत...
आता दोष कुणाला देऊ... ?

नुकताच माझ्या समोरनं वाहत गेला
काळाचा ज्वलंत लान्हा
अकारण थिजला
आणि आग अन् राख यांच्या दरम्यान
गिरक्या खात राह्यला...
पांगला गार अन् वितळलेला धूर...
चेहऱ्यांच्या प्रतिमा झाल्या
शरीरांच्या सावल्या झाल्या...

कुणी जुल्म केला होता ?
कुणावर जुल्म झाला होता ?
हताश बुद्धी विचारहीन भरकटतच राह्यली
अन् मग अकारण थांबली...
माझे साथी नर्काचं खाद्य होते, की काय,

म्हणून निघाले होते शोधायला ?
की
कूस पृथ्वीची चिरली, तर काय होईल...?
बीजात किती उरलाय् रंग बापाचा...
रक्तात प्रेयसीच्या
कोणकोणत्या प्रतिस्पर्ध्यांच्या आहेत सावल्या...?

साऱ्या विश्वाची गुपितं शोधून काढल्याच्या आवेशात
परतले सर्वजण
अन् लक्षात आलं त्यांच्या,
की
सर्वजण झालीत आपल्याच प्रयोगशाळेतल्या आपल्याच टेबलांवर
टेस्टटयूब्ज्‌मध्ये चुळबुळणारी बाळं...

टेबलांवर चुळबुळणाऱ्या
या टेस्टटयूब बेबीज्‌ना कोण करणारंय् वारस म्हणून आपलसं...?
की ती तर होती खुद्द परमेश्वराची मुलं
अन् आली होती जन्माला
क्रूसावर चढण्यासाठीच ?

त्यांच्यांत नव्हतं उरलं काळाला थोपवण्याचं त्राण
उरलं होतं थोडंसं धाडस
काळाचा घोडा वेगानं पिटाळत फिरण्याचं...
वेडे पीर वेगानं घोडा पिटाळत फिरत राह्यले
उघड्या पाठींवर कठोर आसूड विजेचे बरसत राह्यले...
पळत राहण्याशिवाय गत्यंतर नव्हतं
पळता पळता थकून गेले...

हे परमेश्वरा,
माझे साथी तर निष्पाप होते

ते तुझी मुलं होते
मग सैतानी ज्ञानाची प्रचीती त्यांना का बरं झाली ?
तुझी सारी सत्यं झूट आहेत...
खुद्द सत्यच दीर्घायुष्य लाभलेलं एक झूट आहे...

□ नव्या पिढीच्या नावानं....

वळणं घेत घेत आयुष्य आलंय् या गुहेत...
कुठला काटा खुपत नाही, की बोचत नाही एकही खडा इथं...
भिजल्या मातीचा ओला ओला वास आहे...
परमेश्वराची मंदकोमल सावली आहे...
मरणाचा गोडवा आहे...

परमेश्वराच्या मंदकोमल सावलीशी
हज्जार वेळा लढलेलोय्
एकाएका स्वप्नासाठी युद्धं होऊन गेलीत आमच्यांत...
आज माझ्यासाठी आता तहाची वेळ आहे ही
अनादि युद्धासाठी नवी सबब उभी करू नकोस...

माझे डोळे पाहण्याची प्रत्येक यातना सहन करून बसलेत
मला काही दाखवू नकोस...
माझे कान प्रत्येक आवाजाच्या जखमा पचवून पिकून गेलेत
मला काही ऐकवू नकोस...
माझ्या लाडक्या सोबत्यांचे काफिले
आयुष्याच्या घाटाच्या चढावाच्या दिशेनं जाऊ लागलेत
—तुझ्या दगडांच्या माऱ्याच्या टापूत येऊन ठेपलेत...

आज माझ्यासाठी आता तहाची वेळ आहे ही...
साऱ्या दु:खांची धार सवयींच्या आघातांनी बोथट होऊन गेलीये
साऱ्या सापांचं, विंचवांचं जहर केव्हाच मरून गेलंय्
आता केव्हाही गुंगी येईल मला...

झोप येऊ लागलीये
मला उठवू नकोस...
मला काही दाखवू नकोस...
मला काही ऐकवू नकोस...
अनादि युद्धासाठी नवी सबब उभी करू नकोस...

□ दूर चाललेल्या वयाकडं पाहण्याचे काही दृष्टिकोन

१.

कुठल्या वियोगाचा क्षण होता तो ?
कुठं खुडला गेलो होतो मी ?
संपून जाण्याच्या प्रक्रियेत खितपत पडलोय् केव्हाचा...

२.

नाव...
कोणत्या नावाची गोष्ट...
अंगणातलं गर्दहिरवं दाट सावल्यांचं ते झाड
वर्षानुवर्ष ओळखतं सगळ्यांना
चुपचाप उभं आहे...
पण
मुंग्यांच्या रांगा त्याच्यावरल्या संपता संपत नाहीत...
त्याला कसं नावानं माहीत असणार,
की
कोण आलं... ?
कुठं संपलं... ?

३.

कशा आकांक्षा होत्या,
की या अस्तित्वाचे उभे-आडवे धागे आपल्या विचारांशी मिळवावेत

त्यांना पुन्हा एकदा विणावं
स्वतःच्या शैलीत सारं एकदा नव्यानं जुळवावं
उगीच दाखवावी सर्जनाची निःशब्द कलाकुसर
अनुभवून पाहाव्यात पुस्तकांतून आढळणाऱ्या गोष्टी
जडवत जावं स्वप्नांत सापडलेले नवे नवे रंग
कशा आकांक्षा होत्या...
एकाएकी ही हाक आली :
...चल, संपवून टाक
थोडंतरी मागे ठेव येणाऱ्यांसाठी,
की हा निरर्थक तमाशा दीर्घकाळ असाच चालू राहावा...

४.

संभवाच्या वैराण ओसाडीपलीकडं
शून्याच्या निर्जनात घुमणाऱ्या नकाराचं राज्य...
प्रत्येक स्पंदनावर
पिसं गळतात...
प्रत्येक श्वासागणिक
चिमूटभर राख विखुरते...

## □ मी सदैव सरहद्दींवर जगत आलो....

( माझ्या वडिलांसाठी )

मी सदैव सरहद्दींवरच जगत आलो,
जिथं मरणाला जीवन असं येऊन मिळतं–
जसे मिळतात दिवस आणि रात्र परस्परांना...
कधी दिवस सरला अन् रात्र झाली...
कुठं जगणारे माझ्याबरोबर होते
तर कुठं मरणाऱ्यांच्या संगतीत
माझ्याच दुःखांचा तमासगीर होतो मी...

जीवन अन् मरण
या दोन्हीही जगांची सफर
तोवरच असते मंतरलेली जादूनं,
जोवर
हद्दी असतात घराचा उंबरठा
अन् मोकळी असते मधली वाट...

माझ्या विचारांच्या विस्तारांपलीकडं
शतकं, दोन शतकंच नाहीत, तर हजारो वर्षं
अशी गोळा होतात एकाच क्षणात
जशा साऱ्या वाटा फुटतात वाटांमधून
अन् वाटांमध्येच मिसळून तशाच पुढं जातात...

असं वाटतं,
आम्ही कालच निघालो होतो मिस्रपासून

वायद्याच्या त्या मुलखाच्या शोधात
जो आजही राह्यलाय् न सापडलेलाच...
वनवासी भ्रमंतीचे अनुक्रम सांगतात :
पुढं जा,
अजून उंच व्हा,
तहान–भूक यांतून वर या
शरीरधर्माच्या प्रत्येक संवेदनेच्याही वर या...

आजही पसरलाय् सर्वत्र
मिस्रच मिस्र...
वायद्याच्या पूर्तीपर्यंत
कर्बला देहाची
कर्बला प्राणाची
आकाशापासून पाताळापर्यंत
कर्बला...
कर्बला...
कर्बलापासून जाण्याची ही वाट
कुणी बंद करून टाकली अचानक,
तर किंचाळत सुटतील सारे...
ही अवस्था भयानक आहे...

तुम्ही पाह्यलं नाहीत काय,
की देवदूतांनी रचलेल्या आमच्या मृत्यूच्या कारस्थानात
सामील आहे जसं हे पाणी, ही माती
अन् त्यात वागडणारे, उकळणारे सूक्ष्म जंतू कोट्यान् कोटी
तसंच या देहाचे सारे अवयवही सामील आहेत...
आम्हांला जगवणारं रक्तसुद्धा
आमच्या विरुद्ध प्रत्येक पुराव्यानिशी तयार आहे...
काय आम्हांला माहीत नाहीत ती माणसं,
तुकड्यातुकड्यांनी वाटल्या गेलेल्या आमच्या या पृथ्वीवर,

जी जगत राहली एकाच दिशेनं...
किती भोळी होती...
किती निरागस होती ..
निरागस होती प्राण्यांसारखी...पाखरांसारखी...
अशाश्वत शरीरांपासूनच फुटून पालवली होती त्यांचीही शरीरं
पण त्यांना वाटायचं,
आपली मुळं रुतलेलीयूत पृथ्वीत खोलवर
जणू आपण आहोत आल्प्स् किंवा हिमालयाची मुलं...
ती विचारही करायची अशा थाटात,
की जणू प्रत्येक विचाराच्या पंखांत भरलाय्
साऱ्या विश्वाच्या ज्ञानाचा श्वास...
त्यांना वाटायचं,
की सर्वशाली परमेश्वरसुद्धा घेईल आता
त्यांच्याच सल्ल्यानं प्रत्येक निर्णय...

त्यांच्या असहायतेला,
पोरकेपणाला त्यांच्या सीमा नाही...

क्रमांचे बंध नाकारून स्वतंत्र जगणाऱ्यांनो,
सांगा,
की कार्यकारणभावाचा बखेडा हेच जर सर्वस्व आहे,
तर मग
स्वप्न म्हणजे काय आहे ?
का म्हणून ही प्रेमाची अन एकमेकांच्या दुःखांबद्दलची हमदर्दी ?
सुगंध अन् रंग यांची ही जादू काय आहे ?
काय म्हणणार तुम्ही प्राणाच्या या दैवी दूतांना,
जे पूर्वजांच्या रक्तातनं उतरलेत आमच्या शरीरांत,
अन आम्ही ज्यांच्या रक्षणाचे
ठेवीदार रसूल आहोत
साखळीतली एक कडी आहोत...

क्रमांचे बंध नाकारून स्वतंत्र जगणाऱ्यांनो,
तुम्हांला खरोखरीच वाटतं काय,
की आयुष्याचा एवढासा हा तुकडा पुरेसा आहे?
तर मग या,
तुम्हांला दाखवतो
मृत्युशय्येतल्या नित्यभीषण नाटकातलं शेवटचं ते दृश्य
जे दरवेळी तुम्ही पाहता
अन् विसरून जाता :

...किर्र अंधार आहे...
असुरांच्या हल्ल्यांनी हादरतंय् सिंहासन परमेश्वराचं...
पहाड दुभंगतायत...
स्फोट...
जळताना शरीरं तडतडतायत...
उडतायत ठिकऱ्या घरांच्या...
विव्हळण्याचे आवाज...
शिड्यांवरून तोल जाऊन पडू लागलीत पाताळात कित्येक माणसं...
एक यमदूत
भात्यात एक विषारी बाण घेऊन पुढं येऊ लागलाय्
एक अस्थिपंजर देह त्याच्या पुढ्यात पडलाय्
वारंवार उचलून तो आदळतोय् त्या देहाला
खिदळतोय् उपहासानं...
हात, पाय, गळ्याचे स्नायू, शिरा– सारं मृतवत् झालंय्
इतर सारे अवयवही तडफडतायत सतत
डोळे अन् तोंड असे वासलेले आहेत,
जसं जखमी हरिण एखादं
लाथा झाडतंय्...तडफडतंय्...
स्वतः होऊन मागतंय् व्याधालाच भीक मरणाची...

खैर

मी तर माणसाच्या असहायतेची केवळ शोकगीतं गाणाराच आहे
पण कुठंयूत आल्प्स अन् हिमालयाची ती सारी मुलं,
जी मानतात स्वतःला या सृष्टीत सर्वश्रेष्ठ
कदाचित म्हणूनच आज काळाचं
सर्वांत आवडीचं अन्न झालीयूत ती
अन् पंचांग त्यांना चवीनं खातंय्...
आहे कुणी यांच्यांत,
जो पसरून पाहील लकव्यानं निश्चेष्ट झालेले सारे स्नायू
अन् शोधून काढील बाणाचं जहर
आणि त्यानं विझलेल्या रक्ताचा तो बिंदू–
ज्यानं
चालत्या बोलत्या एका देहाला
ममीसारखं एका प्रेतात ओतून विचित्र जपलंय्...
—आता ही बाब वेगळीये,
की माझ्या बापाचं डोकं त्याच प्रेतवत धडावर लागलेलंय्...

...साऱ्यांची रूपांतरं ममीत घालून जपलेल्या प्रेतांमध्ये होण्यापूर्वीच
वर या...
आणखी वर या...
उंच व्हा...
अजून पुढं जा...
तहान, भूक अन् शरीरधर्माच्या साऱ्या संवेदनांच्या पुढं जा...
ऐका...
दूरून येऊ लागलेत जाणाऱ्यांचे आवाज
ऐकू येतायूत ते सोबती, जे पाताळात हरवणार आहेत
अन् तेही जे हरवल्याला युगं लोटलीत...
ते सोबती,
जे पुढं चालतच गेले
ओझी वाहून नेत
कर्बलापासून जात असताना

आपली तहान आपल्याच रक्तानं भागवीत जे पुढं जातच राह्यले
अन् माघार अशक्य व्हावी, म्हणून
आपल्या नौका आपल्याच हातानं जाळीत पुढं निघून गेले...
वायद्याच्या त्या मुलुखाचा शोध घेतच गेले...
एकाच वेळी दोन्हीही दिशांनी जगत गेले...
अन् ज्यांच्यासाठी
साऱ्या हद्दी होत्या घराचा उंबरठा.

□ सिंफनी

वारे वाहतात, तर याचा विचारही नाहीत करत,
की सुगंध कुठं मिसळला येऊन आपल्यात
त्यांना प्रत्येक वळणावरून प्रत्येक बागेवरून वाहायचं असतं
पदरात सुगंध भरून घ्यायचा असतो
फुलांशी संबंधच काय आहे ?

मुळं साऱ्या रोपांची
काहीही न ठरवता पोहोचतात आपोआप
स्वतःच पाण्याच्या तळापर्यंत
ती जन्माला येतात मातीत रुतण्यासाठी
तर रुतू दे;
पाण्याशी मातीचं काय असतं नातं, याचं त्यांना काय आहे ?

रक्त भरतीच्या उधाणात असलं,
तर थपथपत्या लाटांमधनं देह स्वतःच वाहतात
एकाशी दुसरा घेतो जुळवून लय आपल्याच तऱ्हेनं
हज्जार आहेत तऱ्हा
हज्जारही आहेत खऱ्या
प्रेमातलं मीलन अनाहूत असतं, आकस्मिक असतं

आभाळाच्या पलीकडं
कुणी पाह्यलंय्
मनातल्या हाकेला मी हजर आहे, मी हजर आहे म्हणत
आभाळातल्या आपल्या देवापर्यंत सारेच जाऊन पोहोचतात

कुठंच कुणी अडखळत नाही
दाही दिशांच्या घनगर्द अंधारात
पाय
पुढं चाललेले पाय
त्यांना उपजतच असतं माहीत,
की अंधारात चाचपत चालण्याची रीत काय आहे

एकाआड एकेका आभाळाच्या खाली
सर्वत्र तीच अनघड जमीन आहे
तिची नाडी चांदण्यांच्याही वर धुगधुगते
स्वप्नांच्या घाण्याला जुंपलेली
ओझी वाहत राहणारी
तुमच्या–आमच्यासारखी
सर्वत्र तशीच भलीबुरी माणसं आहेत
तशीच एकसारखी हरेक वाट आहे.

REFBK-0025899

□ मुक्ती

१.

जखमा पुन्हा हिरव्या झाल्या...
पुन्हा एकदा उलघाल होऊन उसळलंय् रक्त
आंधळ्या वाटांवर अव्याहत झेपावण्यासाठी...

बंद डोळ्यांच्या स्वर्गात
साऱ्या खिडक्या, सारी कवाडं उघडली गेली....
अन मग मीच निर्मिलेल्या अफाट विश्वात
धुकं होऊन
पसरत चाललोय् मी
आकसत चाललोय् मी
अनादि अनंत ईश्वराच्या श्वसनासारखा...

माझ्या पुढं पुढं आहेत जमाव...
ज्यालाही दिलं जे नाव,
तो ते झाला...
माझ्या संबंधानं आहेत बांधलेले साऱ्यांचे क्रम...
साऱ्यांच्या जगण्या-मरण्याचा कर्तासवरता
मीच
पृथ्वी अन् आकाश यांच्यामध्ये
ज्यांनाही नाही मिळू शकला निवारा,
त्यांनी यावं माझ्याबरोबर
वाट पाहत्येय् आजही त्यांच्यासाठी

शब्दाशब्दांवर पसरलेली
अथांग
अफाट
जागा...

२.

मलाही नाही आजपर्यंत मिळू शकलं
दिवसरात्रीच्या तमाशाचं बीज,
जे माझ्या स्वतःच्या रीतीनं
अगदी नांगरटीपासून पुन्हा नव्यानं पेरता येईल मला...

कुठले क्रम... ?
कसले संबंध... ?
धमन्यांमध्ये फक्त इतकंच रक्त उरलंय्,
की
पंखापंखांत जमवून जरासं वारं
भरू शकेन शेवटची भरारी...

अविरत विचार...
वादळी विचारांमध्ये विरळ होत चाललोय् मी...
अन् थपडेथपडेनं माझी आकृती चाटताना
हवा धुकं होऊ लागलीय्...
धुकं दाट होऊ लागलंय्...
निघून चाललेल्या काळाशी
मी जुळत चाललोय्...
जुळला...
माझं काम संपलं.